



१५ मे १९६५
२५ पैसे

# माणूस



# माणूस

वर्षारंभ विशेषांक

१ जून १९६५

**पंचवीस पैसे**




वर्ष चौथे : अंक एकोणिसावा : १५ मे १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

---

व्यक्ती आणि वार्ता : ● हो चि मिन्ह
□ वा. दा. रानडे

कथा : ● पीस
□ जयश्री खिरे

● सवत
□ शरदिनी मोहिते

कविता : □ सुधाकर देशमुख
□ केशव मेश्राम

ललित-शास्त्रीय लेख : ● रक्तदाब
□ डॉ. पु. शं. वैद्य

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
□ रा. म. शास्त्री

शिवाय : ● जगाच्या पाठीवर, दिल्लीदरबार, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विचार-वारे, भितीवरील तुंबड्या ही नेहमीची सदरे.

मुखपृष्ठ : ● सुरेश आठवले

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.

# प्रणाम


'प्रत्यक्ष यशाचा आणि राजकीय मुत्सद्देगिरीचाच फक्त निकष लावला, तर स्टॅलिनच्या आसपास त्याच्या कालखंडातील क्वचितच कोणी व्यक्ती पोहोचू शकेल, याबद्दल मला शंका नाही.'

'मी अर्थातच असे मानीत नाही, की यश हा एकच निकष राजकारणात मानण्यात यावा. साधनांची शुचिता राजकारणात अवश्य पाळली गेली पाहिजे. सामान्य नीतितत्त्वे राजकारणात पायदळी तुडविली जाणे नेहमीच संभवनीय असते, कारण 'अस्तित्वासाठी सतत चढाओढ' हे त्याचे नित्याचे स्वरूप असते, पण मी त्याच राजकीय पुढाऱ्यांना आणि मुत्सद्यांना थोर समजतो, की जे व्यवहार आणि ध्येयवाद यांची सांगड घालू शकतात व मूलभूत नीतिमूल्यांची योग्य ती कदर ठेवूनही आपल्या ध्येयाकडे निश्चित वाटचाल करू शकतात...'

मिलोव्हन जिलास– Converstions with Stalin


पंडित नेहरूंच्या निधनाला येत्या २७ मेला एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यांच्या चरित्राचे व कार्याचे यथोयोग्य मूल्यमापन होण्यास अद्याप बराच कालावधी जावा लागेल. खूप माहिती व घटना अप्रकाशित आहेत व अवश्य ती वस्तुनिष्ठताही इतक्या जवळच्या काळात धारण करणे अनेक कारणास्तव शक्य नसते. त्यांतून पं. नेहरूंचे जीवन हे एकसुरी व समन्वित जीवन नव्हते. निरनिराळ्या काळी निरनिराळ्या प्रेरणांचा, विचारांचा पगडा त्यांच्या मनावर असे आणि या सर्व विविध प्रेरणांचा आणि विचारांचा समन्वय साधणे त्यांना अखेरपर्यंत जमू शकले नाही. किंबहुना असेही म्हणता येईल, की त्यांचा स्वतःचा किंवा सत्याचा शोध शेवटपर्यंत अखंडपणे चालूच राहिला होता. ते सतत विकसित होणारे, प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करणारे एक ओजपूर्ण जीवन होते. नेहरू पूर्णमानव नव्हते, त्यांना तसे होणे कदाचित आवडलेही नसते. अपूर्णाकडून पूर्णत्वाकडे जाण्यातच धन्यता मानणारे ते एक श्रेष्ठ मानवी जीवन होते.

वर दिलेल्या जिलासच्या अवतरणातील अखेरचा भाग पंडितजींना जेवढा लागू पडतो, तेवढा त्यांच्या समकालीनात इतर कोणासही लागू पडत नाही. पंडितजींची अनेक धोरणे फसली; त्यांची शत्रुमित्रपारख चुकली; त्यांचे अनेक निर्णय इतिहासाने निखालस चुकीचे ठरविले. हे सर्व जरी सत्य असले, तरी 'मूलभूत नीति-



मूल्यांची योग्य ती कदर ठेवून ते आपल्या ध्येयाकडे निश्चित वाटचाल करीत होते, ' यात तिळमात्र शंका नाही. यश व निश्चित फलप्राप्ती हा एकच निकष मानला तर पंडितजींचा वारसा इतरांच्या तुलनेने कदाचित कमी भासेल, पण राजकारणाच्या कलहसृष्टीत वावरत असतानाही त्यांनी बाळगलेले नैतिकतेचे भान हा त्यांनी मागे ठेवलेला फार मोठा वारसा आहे–प्रत्येक भारतीयाने अभिमान बाळगावा असा. नेहरूंच्या भारतीयत्वाचा, हिंदुत्वाचा हा अस्सल अंश होता, असे म्हटले तरी चालेल. हा अंश, हे भान विसरा आणि रामायण-महाभारतात किंवा एकूणच भारतीय संस्कृतीत काय शिल्लक उरते ते पाहा. जणू हा महाभारतकालीन धर्मराजच नव्या रूपाने आधुनिक काळात वावरत होता. या धर्मराजास, या आधुनिक राजर्षीस सहस्र प्रणाम.

श्री. ग. मा.



# भारत :
# आज आणि उद्या

आपल्या नितळ प्रतिभेने

जवाहरलाल नेहरू

यांनी केलेले भारताच्या इतिहासाचे, वर्तमानाचे

आणि भविष्याचे एक वेधक रेखाटन

## • पौरुषाने आणि जोमाने रसरसलेला वंश

भारत कसा आहे ? हाच प्रश्न माझ्या मनात वारंवार आला आहे आणि भारताच्या गतेतिहासाचे आणि वर्तमानकालाचे अवलोकन करून त्याचे उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न मी माझ्या अनभ्यस्तरीतीने केला आहे. आपल्या प्राचीन इतिहासाची प्रारंभिक वर्णने वाचल्यानंतर माझे मन आश्चर्याने चकित होऊन गेले. पौरुषाने आणि जोमाने रसरसलेल्या एका वंशाचा हा इतिहास होता. त्यांच्या ठिकाणी जिज्ञासा होती, अनिर्बंध संशोधनाची त्याला आंतरिक तळमळ होती आणि त्याच्या ज्ञात आणि प्राचीन कालावधीतसुद्धा प्रगल्भ आणि सहिष्णु संस्कृतीचा तो पुरावा देत होता. जीवनाचा आणि त्यातील सुखदु:खांचा स्वीकार करून हा वंश अंतिम आणि विश्वव्यापी तत्त्वाचा सतत शोध करीत होता. संस्कृत या समृद्ध भाषेची त्याने उभारणी केली आणि या भाषेच्या आणि आपल्या शिल्पकलेच्या आणि चित्रकलेच्याद्वारे त्याने आपला जिवंत संदेश दूरदूरच्या देशांना पोचवला. त्याने उपनिषदे आणि गीता निर्माण केली; बुद्धाला जन्म दिला.

एखाद्या वंशाच्या किंवा जातीच्या इतिहासात, इतकी महत्त्वाची भूमिका, संस्कृतप्रमाणे जगातील दुसऱ्या कोणत्याही भाषेने क्वचितच बजावली असेल. संस्कृत भाषा ही सर्वोत्तम विचारांच्या आणि सर्वोत्कृष्ट वाङमयाच्या अभिव्यक्तीची साधन होती, इतकेच नव्हे तर भारतामध्ये राजकीय भेदाभेद असतानाही त्याची एकजूट साधण्याचे कार्य तिने केले. रामायण आणि महाभारत हे ग्रंथ, हजारो वर्षे प्रत्येक पिढीतील लक्षावधी लोकांच्या जीवनाचे भाग बनले आहेत. आम्ही भारतीय वंशाचे लोक, बुद्धाला, उपनिषदांना आणि रायायण-महाभारत यांसारख्या ग्रंथांना विसरलो, तर आमच्याजवळ शिल्लक काय राहील, असा प्रश्न माझ्यापुढे सदैव उभा राहतो. तसे झाले तर आपला हा वंश निराधार बनून जाईल आणि या प्रदीर्घ कालावधीमध्ये ज्या मूलभूत गुणांनी आपल्याला वैशिष्टय प्राप्त करून दिले, ते गुणही नाहीसे होतील आणि मग भारत हा भारत राहणार नाही.

हळूहळू अवनतीला सुरवात झाली, विचारांचा ताजेपणा नाहीसा झाला; तो शिळा झाला, तारुण्याचा जोम आणि उन्माद नाहीसा होऊन त्या ठिकाणी दुर्बल वार्धक्य आले. साहसी वृत्ती नाहीशी होऊन निर्जीव साचेबंद जीवनाला सुरवात झाली आणि अखिल जगाचे विशाल आणि खळबळजनक स्वप्न, जातिभेद, संकुचित सामाजिक चालीरीती आणि समारंभ या सर्वांमध्ये विरून गेले. तरीसुद्धा भारतातील अफाट जनसागरामध्ये बाहेरून वारंवार येऊन मिसळलेल्या अनेकविध वंशांच्या लोकांना आत्मसात करण्याचे सामर्थ्य भारतामध्ये होते आणि तारुण्याच्या ऐन जोमामध्ये ज्या विचारांनी भारताला कार्यप्रवृत्त केले होते, त्यांचा त्याला कधीही विसर पडला नव्हता.

त्यानंतर आलेल्या इस्लाम धर्माचा आणि मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा भारतावर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्यापाठोपाठ पाश्चात्त्य वसाहतशाही राष्ट्रे आली त्यांनी एक नव्याच प्रकारचे वर्चस्व सुरू केले; एका नव्या वसाहतशाहीचा अंमल सुरू केला आणि त्याचबरोबर युरोपमध्ये वाढीला लागलेल्या औद्योगिक संस्कृतीचा आणि नव्या कल्पनांचा भारतावर पगडा बसविला.

या कालावधीचा शेवट, दीर्घकाळ चाललेल्या लढ्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीमध्ये झाला. आता गतकाळातील या जबाबदाऱ्यांच्या जाणिवेचे ओझे मनात बाळगून, मनात चित्रित केलेल्या अर्धवट स्वप्नांना आणि भावी काळाच्या प्रेरणांना मूर्त-

[ पृष्ठ ७१ वर चालू ]

## सूचना

- दीपावली व सर्व खास अंकांसह माणूसची वार्षिक वर्गणी आठ रुपये व परदेशी बारा रुपये आहे.
- **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवावयाचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.
- **अंक न पोहचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.
- **लेखकांसाठी** : स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

दिल्ली दरबार

# अफवांचे पेव

दिल्ली दरबारात सध्या अफवांचे पेव फुटल्यासमान स्थिती आहे. संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण जणू कऱ्हाडला स्वग्रामी जाण्याच्या तयारीत बसलेले आहेत; फार काय पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री आपली स्वत:ची दुर्बलता झाकण्यासाठी श्री. चव्हाणांचा बळी देऊन मोकळे होणार आदि 'सुरस व चमत्कारिक कथा' राजधानीत सहज कानोसा घेतला, तरी ऐकावयास मिळत आहेत! संसदेच्या आवारातही कोणीतरी हळूच येऊच कुजबुजतो, की खासदार श्री. अतुल्य घोष श्री. चव्हाणांना नुकतेच भेटले होते. ते (घोष) सांगत होते, की 'चव्हाण काही विशेष खूष नाहीत.' (He is not very happy)! दिल्लीपासून दूर असणाऱ्यांनी यापैकी कोणताही भाग जरी उडत उडत ऐकला तरी त्यांची गाळण उडते. त्यांना वाटू लागते, की पाकिस्तानचा विजय झाला असून शास्त्रीसरकार बहुवा गडगडण्याच्या मार्गावरच आहे! खुद्द कच्छच्या रणक्षेत्रात भारतीय सैनिकांनी मर्दुमकी गाजवून पाकिस्तानी सेनेला पाणी पाजलेले असले, तरी प्रचार–आघाडीवर मात्र पाकिस्तानच विजयश्री प्राप्त करीत आहे, असाच अर्थ दिल्ली दरबारातील अफवा ऐकून काढावा लागेल. प्रत्यक्ष आघाडीवर सैनिक प्राणांची बाजी लावून सिद्ध बसलेले असताना भारताच्या राजधानीत अशा अफवांना पाय फुटणे म्हणजे अप्रत्यक्षरीत्या शत्रूचेच हात मजबूत करण्याजोगे दुष्कृत्य आम्ही न कळत करीत असतो; हे ज्या दिवशी दिल्ली दरबारातील दरकदारांच्या ध्यानी येईल, तो सुदिन म्हणून मानावा लागेल, अशी चिंतनीय स्थिती आहे! या अफवा कोण प्रसृत करते; त्याला प्रथम कोण बळी पडतात; त्याचे दुष्परिणाम काय होतात आदि सर्व शोधून काढणे मोठे मनोरंजक ठरेल. स्थलाभावी एवढाच उल्लेख करतो, की यात शास्त्रींचे विरोधक; चव्हाणांचे अहित इच्छिणारे; पाकिस्तान व पेकिंगप्रेमी भाडोत्री भाट; स्वत: निष्कारण महात्म्य वाढवू इच्छिणारे वाजारबुणगे यांचाच बहुतेक समावेश असतो. या सर्वांना मिळून आपापल्यापरीने काय काय साधावयाचे असते, हे इतके सुस्पष्ट आहे, की त्यांवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता भासू नये. यातील काही मंडळी इतकी चाणाक्ष असतात, की ती श्री. चव्हाण केव्हा केव्हा व कोठे कोठे हजर नव्हते, हे शोधून काढून हळूच कुजबुजीला प्रारंभ करून देण्यात चतुर असतात. या मंडळींजवळ कल्पनाचातुर्यही विपुल असते; त्यामुळे पंतप्रधान काय म्हणाले; किती नाराज दिसले आदि 'मसाला' ते गप्पांमध्ये भरून सामान्यांच्या मनाला लीलया भारून टाकतात!

## □ भरपूर व योग्य माहितीची निकड

आक्रमक चीन असो, की पाकिस्तान असो, भारताला यापुढे सदैव सिद्ध राहावे लागणार आहे; याची तीव्र जाणीव सद्य:स्थितीमुळे अनेकांना होऊ लागल्याची चाहूल सध्या लागत असते. अशा जागृत जनतेला वर उल्लेख केलेल्या अनिष्ट अफवांच्या वावटळीतून वाचवावयाचे असेल, तर जनतेला अधिकाधिक माहिती देऊन त्यांचे मनोबल (मोराल) वाढविण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न समाजधुरीणांना व सरकारला करावे लागतील. राजधानीत दि. सात मेपासून देशातील सर्व माहिती (इन्फर्मेशन) मंत्री व त्यांचे प्रसिद्धी संचालक एकत्र आलेले आहेत. ही मंडळी याचा सरकारी स्तरावर विचार करणारच आहेत; परंतु बिनसरकारी प्रयत्न म्हणून या दिशेने कोणती पावले टाकता येतील, याचा विचार केला जाणे आवश्यक आहे, असे येथे अनेक विचारवंतांना वाटू लागले आहे. 'भरपूर व योग्य माहिती म्हणजे आधुनिक ज़मान्यातील दारूगोळाच मानला जातो,' असे समाजशास्त्री म्हणतात. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र अशी आहे, की याकडे आपले पूर्णतया दुर्लक्षच झालेले आहे. भारत सरकारच्या प्रसिद्धी विभागाने सुमारे एक महिन्यापूर्वी कच्छ–सिंध सीमा दर्शविणारे नकाशे प्रसृत केले आणि अवघ्या दोनच दिवसांत सांगण्यास प्रारंभ केला, की परवा दिलेल्या नकाशात थोडया दुरुस्ती करून घ्या! विदेशी पत्रकारांनी 'रण ऑफ कच्छ' शब्दप्रयोग ऐकताच 'रण' म्हणजे काय विचारण्यास प्रारंभ केला, तर आमच्या येथील विद्वानांमध्येच या शब्दावर रण माजण्यास प्रारंभ झाला! ज्या भूप्रदेशाचा भूगोल वा इतिहास तुम्हा मंडळींना ज्ञात नाही, तो भूभाग आपल्या कबजात राहावा, असे म्हणण्याचा तुम्हाला काय अधिकार, असा अवघड प्रश्न कोणी विदेशी वार्ताहराने विचारला नाही, म्हणूनच आमच्या अब्रूची लक्तरे निघाली नाहीत! अशी दुर्दशा असल्याने सर्वत्र धावपळ होऊन माहिती गोळा करण्याचे कार्य सध्या चालू असलेले दिसत आहे. 'तहान लागल्यावर विहीर कोठे खणावी,' अशा थाटात विचारचक्रे गतिमान होऊ पाहत आहेत. उत्तर कच्छ विभागात भुज वा खावडा या दोन प्रमुख गावांच्या पलीकडे थेट आधाडीपर्यंत भारतीय सैनिकांना पिण्याचे पाणी पुरवावयाचे असेल, तर रोजच्या रोज शेकडो मैल हजारो लिटर पाणी वाहून नेण्यापेक्षा कोठे कोठे मोकाच्या विहिरी (नलकूप वा ट्यूबवेल्स) खणणे शक्य आहे, याचा विचार सरकार–दरबारी नुकताच कोठे चालू झालेला आहे. यापुढे या विचाराच्या आधारे 'फाईल' तयार होऊन ती या मंत्रालयातून त्या मंत्रालयात फिरेल आणि अमुक स्थळी अशा विहिरी खणा; म्हणून आदेश निघेल. त्यावेळेपावेतो त्या कच्छच्या भूप्रदेशात समुद्राचे पाणी पाच पाच फूट भरून तेथे दलदल निर्माण झालेली असेल! म्हणजे आता नोव्हेंबर महिना उजाडेपर्यंत ही महत्त्वपूर्ण फाईल' धूळ खात पडेल व ऐनवेळी न सापडल्याने पुन्हा नवीन 'पाहणी'

(सर्व्हे) चालू होईल ! दिल्ली दरबारात माहितीच्या अभावी न कळत कसा गलथानपणा निर्माण होतो; याची आणखी उदाहरणे सादर करणे आवश्यक आहे का ?

## □ बियारबेटची व्यूहरचना

अफवा व माहिती यांचा समाचार घेतल्यानंतर सैनिक-शास्त्राकडे वळतो. [ सैनिक-शास्त्र शिक्षणाची किती आबाळ आहे, याविषयी मागे एका प्रसंगी कळविलेले होते; ते वाचकांच्या विस्मरणात अद्याप जमा झालेले नसेल अशी आशा आहे. त्यामुळेच कच्छ–रणक्षेत्रातील धुमश्चक्रीनिमित्ते पुन्हा सैनिक-शास्त्र शिक्षण विषयाकडे लक्ष वेधीत आहे. ] अफवेला बळी पडून आणि माहितीच्या अभावी राजधानीत अगदी चांगल्या चांगल्या मंडळींनी विचारणा केली, की पाकिस्तानी सेना जर अमेरिकी रणगाडे घेऊन कच्छमध्ये हल्ले करीत आहे, तर त्याला तोंड देण्यासाठी भारतीय सेना रणगाडे घेऊन का गेली नाही ? कच्छच्या रणातून जाताना कित्येक प्रसंगी ' जीप ' सारखे समर्थ वाहनसुद्धा दलदलीच्या प्रदेशात रुतून बसते, तर अशा अवघड स्थळी भारतीय सैन्याने रणगाडे न्यावे कसे ? ही माहिती कोणी दिलीच, तर त्याला लगेच विचारले जाई, की भारताने रणगाडे ' एअर लिफ्ट ' (विमानद्वारा) करून का नेले नाहीत ? भुजपासून आघाडी वा आंतरराष्ट्रीय सीमा सुमारे ५० ते ६० मैल दूर आहे व भुजच्या पलीकडे मोठी विमाने जाऊ शकत नाहीत. कारण योग्य असा विमानतळच नाही, हे या महाभागांना कोणी सांगावयाचे ? कारण लगेच प्रश्न पुढे येईल, की विमानतळ का बांधला नाही ? याचे उत्तर कदाचित देता यईल. परंतु आज तो उपलब्ध नाही; ही गोष्ट मात्र ध्यानी घेण्यास हे महाभाग तयार नसतात. पाकिस्तानी सेनेला भारतीय सैनिकांनी पॉइंट ८४ व बियारबेट या दोन स्थळी खडे चारल्यानंतर शत्रूसेना सिंध सीमेवर परत गेली, असे ऐकताच हे महाभाग विचारू लागतात, की मग आम्ही पॉइंट ८४ व बियारबेट पुन्हा लगेच कबजात का घेतले नाही ? ही दोन्ही स्थळे म्हणजे नुसते काल्पनिक बिंदू असून त्या स्थळी सभोवतालच्या सपाट दलदलीपेक्षा थोडासा उंच प्रदेश आहे. तेथे वस्ती नाही यामुळे त्या बिंदूनाच चिकटून न राहता भारतीय सेना आसमंतातच अगदी निकट नवे आवरण (कव्हर) शोधून काढून पुन्हा तळ ठोकून बसली, अशी व्यूहरचना (स्ट्रॅटेजी) यांना विशद करून सांगितली तरी या महाभागांची शांती होत नाही. बियारबेटचा कबजा परत का घेतला नाही, असा तरी प्रश्न ते विचारतात किंवा व्यूहरचना आदि समजावून घेण्याच्या भानगडीत न पडता (उगीच डोक्याला त्रास कशाला, अशा सोईस्कर विचारे) म्हणू लागतात, की भारतीय सेनेची पिछेहाट झाली, असे सरळ मान्य न करता ही वर सारवासारव करता काय ? एखाद्या मोर्चावर (फ्रंटवर) हरलो तर लढाई हरलो, असे म्हणता येत नाही, हे जे सैनिकशास्त्रातील सिद्धांतरूपी सूत्र आहे, हे जर

या मंडळींना सांगितले तर लगेच ते म्हणू लागतात, की 'बनवाबनवी करण्यासाठी शब्दच्छल कशाला?' आघाडीवर कार्यरत असलेल्या वा पूर्वी तेथे कार्यरत राहून, परतलेल्या अनुभवी व्यक्तीला जेव्हा हे सर्व अज्ञानजन्य संवाद एकावयास मिळतात, तेव्हा त्याला खेद तर होतोच, पण संतापही येतो. कारण अनाधिकारतेने केलेल्या सैनिक-शास्त्रचर्चेमुळे या शूर, वीर व उमद्या मंडळींचा तेजोभंगच होण्याचा संभव अधिक असतो.

## □ अती चाणाक्ष व चतुर शास्त्रीजी

कच्छ–रणक्षेत्रावरील धडाड्धुम सध्या शांत (Lull) झाल्यागत दिसत असल्याने दिल्ली दरबारात सध्या पंतप्रधानांच्या मॉस्को (वारीविषयी) प्रवासाविषयी चर्चा चालू आहे. पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांची ही रशिया-यात्रा घडूच नये, अशी पाकिस्तानची इच्छा होती व त्यासाठीच ९ एप्रिलपासून कच्छ-सिंध सीमेवर 'दारूगोळा उडविणे' चालू करण्यात आले होते, असा कयास येथे राजकीय निरीक्षक व्यक्त करीत आहेत. [आपल्या हाती हा अंक पडेल तेव्हा आपले पंतप्रधान बहुधा ही यात्रा सफलतापूर्वक संपवून दिल्लीत पुन्हा पदार्पण करण्याचे तयारीत असणार.] परंतु आज दुपारपर्यंत मिळालेल्या माहितीच्या आधारे असे निश्चित झालेले दिसत आहे, की श्री. शास्त्रीजींचा हा प्रवास निश्चितच रद्द होत नाही. सध्यापुरता अमेरिका–प्रवास रद्द झाला असल्याने हा प्रवासही रद्द करावा, असे सुचविणारी मंडळी निघालीच! पाकिस्तानप्रकरणी ब्रिटिश व अमेरिकन सरकार ज्या पद्धतीने भारताशी व्यवहार करीत आहेत, ते पाहता निदान यावेळी तरी रशिया-यात्रा रद्द करू नये, असाच सूर अनेकांनी लावलेला आहे. आजच्या घटकेला तरी दिल्ली-दरबारात अशी भावना व्यक्त होत आहे, की 'शास्त्रीजींना जाऊन येऊ द्या रशियाला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात वावरण्याचा त्यांचा आत्मविश्वास थोडा अधिक वाढेल व त्या क्षेत्रातील त्यांची प्रतिष्ठाही वाढीस लागेल.' हे सर्व पैलू महत्त्वाचे असले तरी सर्वांत महत्त्वाची गोष्ट घडणार आहे व ती म्हणजे श्री. शास्त्रीजी दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारे नसल्याने रशियातील आजचे प्रमुख सूत्रधार; त्यांचे बोलणे व व्यवहार आदि जिव्हाळ्याच्या बाबींविषयी 'फर्स्ट हँड' ज्ञान ते प्राप्त करून घेऊन अचूक निदान करू शकतील, की जे भारताला उपकारकच ठरेल. श्री. शास्त्रीजी प्रतिभावान आहेत, असा त्यांच्याविषयी बोलबाला नसला तरी ते अती चाणाक्ष व चतुर आहेत (Clever and cunning) असा अनुभव मात्र येथे अनेकांना येऊ लागलेला आहे. 'सौम्य चेहरा' हा त्यांचा मुखवटा फसवा आहे, असेही काही राजकीय निरीक्षक म्हणू लागलेले आहेत. या दृष्टीने पाहता रशिया-प्रवास पथ्यावरच पडेल, असा आशावाद येथे व्यक्त केला जात आहे. **–दरबारी**

व्हिएटनाम : १९ व्या शतकाच्या मध्याला ब्रिटिशांच्या अमलाखाली हिंदुस्थान गेला, त्याच सुमारास फ्रान्सचे अधिराज्य आग्नेय आशियातील या निसर्गसंपन्न देशावर प्रस्थापित झाले. तत्पूर्वी जवळजवळ एक हजार वर्षे व्हिएट-नामवर चीनचे अधिराज्य होते.

दुसऱ्या महायुद्धात फ्रान्सचा सुरवातीलाच पाडाव झाला आणि व्हिएटनामच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा झाला. या स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व हो चि मिन्ह व त्यांची व्हिएटकाँग ही क्रांतिकारक संघटना यांनी केले.

आज या व्हिएटनामच्या प्रश्नाला पुन्हा जागतिक महत्त्व आलेले आहे. भारता-प्रमाणेच व्हिएटनामची फाळणी झालेली आहे. उत्तर व्हिएटनाममध्ये हो चि मिन्ह यांची कम्युनिस्ट राजवट आहे, तर दक्षिण व्हिएटनाममध्ये अमेरिकेच्या आश्रया-खाली आजवर अनेक लष्करी व निमलष्करी राजवटी आल्या व गेल्या. हो चि मिन्ह यांना देशाची ही फाळणी मंजूर नाही व द. व्हिएटनाममधील अमेरिकेचे वर्चस्व उलथवून टाकून अखंड व्हिएटनामवर एकछत्री कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

ही महत्त्वाकांक्षा सफल झाली, तर आग्नेश आशियातील लाओस, कांबोडिया, सिलोन, ब्रह्मदेश हेही देश एकामागोमाग एक कम्युनिस्ट विस्ताराला बळी पडतील व अमेरिकेला व सर्वच स्वतंत्र जगताला ते एक जबरदस्त आव्हानच ठरेल. यासाठी कम्युनिस्टविस्ताराला व्हिएटनामच्या भूमीवर आताच रोखून धरण्यासाठी अमेरि-केने सध्या उत्तर व्हिएटनामवर प्रखर विमानहल्ल्यांची मोहीम हाती घेतली आहे.

पण या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांमुळे उत्तर व्हिएटनाम शरण येऊन कम्युनिझम-विस्ताराला पायबंद बसण्याची शक्यता आजतरी कमी आहे. कारण उत्तर व्हिएट-नामचे नेतृत्व कडवे आहे, लढाऊ आहे, गनिमी युद्धाचा त्याला दीर्घकाल सराव आहे.

या नेतृत्वाचा हा अल्पपरिचय

●

उत्तर व्हिएटनामचा

कडवा नेता

# हो चि मिन्ह

वा. दा. रानडे



व्हिएटनाममधील युद्धाने आज साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. उत्तर व्हिएटनामवरील लष्करी ठाण्यांवर अमेरिकन विमाने रोज बाँबफेक करीत असून युद्धाचे क्षेत्र यामुळे वाढेल काय, अशी चिंता व्यक्त करण्यात येत आहे. रशिया आणि चीनने या युद्धात अजून उघड हस्तक्षेप केलेला नाही. आपल्या बाँबहल्ल्यांमुळे उत्तर व्हिएटनामची दक्षिण व्हिएटनाममधील बंडखोरांना होणारी मदत थांबेल, बंडखोरांचा प्रतिकार मंदावेल आणि युद्ध आटोक्यात येईल, अशी अमेरिकेची अपेक्षा, पण तसे काही घडलेले नाही याचे कारण उत्तर व्हिएटनामला लाभलेले हो चि मिन्ह यांचे कुशल, कणखर, कडवे, झुंजार व चिवट नेतृत्व. शत्रू सामर्थ्याने कितीही मोठा असला तरी दीर्घकाळ लढा देऊन त्याला कसे जेरीस आणावे, याचे तंत्र हो चि मिन्ह यांनी चांगले आत्मसात केले आहे.

**तुम्हीच प्रथम दमाल**

"तुमच्या एका माणसामागे आमच्यातील दहाजणांना तुम्ही ठार कराल, पण अखेर तुम्हीच प्रथम दमाल," असा इशारा हो चि मिन्ह यांनी फ्रेंचांना दिला होता. अकरा वर्षे चाललेल्या युद्धात अखेर फ्रेंचांचा पराभव झाला. चिकाटीने युद्ध चालवून फ्रेंचांविरुद्ध आपण विजय मिळविला तसाच अमेरिकनांविरुद्ध मिळवू असा आत्मविश्वास हो चि मिन्ह यांना वाटतो.

हो चि मिन्ह यांच्या वैयक्तिक जीवनासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यांची जन्मतारीख निश्चित कोणती याबद्दलहि एकमत नाही. १८९०, १८९१, १८९२ अशी तीन भिन्न वर्षे कम्युनिस्ट चरित्रकारच सांगतात, पण १९ मे १८९० ही जन्मतारीख अलीकड बहुसंख्य अभ्यासक मान्य करतात. उत्तर व्हिएटनाममध्ये हा दिवस आनंदोत्सवाचा दिन म्हणून साजरा केला जातो, तसेच व्हिएटनामच्या स्वातंत्र्यलढ्यातील काही महत्त्वाच्या घटना १९ मे या दिवसाशी निगडीत आहेत. व्हिटमिन्ह संघटनची स्थापना १९४१ साली याच दिवशी झाली.

## अटक चुकविण्यास टोपण नावे

मध्य व्हिएटनाममधील नघे आन प्रांतातल्या नाम-दान जिल्ह्यांतील किय-लिन खेड्यात होचा जन्म झाला. जन्मतारखेचे रहस्याप्रमाणेच या नेत्याच्या जन्मकाळच्या नावाबद्दलही रहस्याचे वलय आहे. ' नगुएन आय-क्वॉक ' (देशभक्त नगुएन) असे त्याचे नाव होते, असे काही पाश्चात्त्य कम्युनिस्ट चरित्रकार सांगतात तर रूथ फिशरच्या मते त्याचे नाव नगुएन थाट थान्ह (विजयी नगुएन) असे होते. याशिवाय आपल्या क्रांतिकारक राजकीय जीवनात अटक चुकविण्यासाठी निदान बारा तरी टोपणनावे हो यांनी धारण केली. हो चि मिन्ह (प्रकाशदाता) हे त्यांचे नाव त्यापैकीच एक. त्या नावानेच ते आता सर्वत्र ओळखले जातात.

## पित्याकडून राष्ट्रवादाचे धडे

तीन भावंडात हो सर्वात धाकटे. वडील बहीण थान्ह आणि भाऊ खिएम. या दोघांनीही राजकारणात भाग घेतला नाही. भातशेती करीत ते आपल्या गावीच राहिले. हो चि मिन्ह यांचे वडील सरकारी अधिकारी असले तरी राष्ट्रवादी होते. जेत्यांची भाषा शिकण्यास नकार देण्याचे धैर्य ज्या काही थोड्या अधिकाऱ्यांनी दाखविले त्यापैकी होचे वडील एक होते. सरकारी नोकरीतून त्यांना बडतर्फ करण्याचे हे एक कारण असावे. शिवाय फ्रेंचविरोधी गुप्त संघटनांतही ते कार्य करीत होते व या संघटनेतील कार्यकर्त्यांना वडिलांचे गुप्त संदेश पोचविण्याचे कार्य नऊ वर्षांचा हो करीत असे. राष्ट्रवादाचे आणि राष्ट्रीय चळवळीचे प्राथमिक धडे त्याने याप्रमाणे वडिलांपासून घेतले.

होचे शिक्षण ह्यू येथील लीसी क्वॉक हॉक शाळेत झाले. त्या काळात व्हिएटनाममधील ही सर्वात उत्कृष्ट शाळा समजली जात होती. दक्षिण व्हिएटनामचे माजी अध्यक्ष नगो दिन्ह दिएम यांचे वडील नगो दिन्ह खा यांनी ती स्थापन केली. विद्यार्थ्यांना पाश्चात्त्य ज्ञान तर मिळावे, पण फ्रेंच मतांचा पगडा त्यांच्या मनावर बसू नये अशा उद्देशाने ही शाळा स्थापन केलेली होती. व्हिएटनामच्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेले अनेक क्रांतिकारक– मग ते उत्तरेकडचे असोत किंवा दक्षिणेकडचे असोत– याच शाळेत शिकले. फ्रेंचविरोधी चळवळीशी संबंध ठेवल्यामुळे होने

१९१० साली डिप्लोमा न घेताच शाळा सोडली.

## बोटीवर किचनबॉय

यानंतर दक्षिण अनाममधील फान-थिएट शहरातील एका खासगी शाळेत शिक्षक म्हणून हो चि मिन्ह काम करू लागले. क्वॉक हॉक शाळेच्याच धर्तीवर ही शाळा चालविण्यात येत होती, पण तेथील संथ निष्क्रिय जीवनात त्यांचे मन रमेना. आपली वाढ खुंटत आहे, असे त्यांना वाटू लागले व त्यांनी फ्रान्सला जाण्याचे ठरविले. १९११ च्या उन्हाळ्यात फान-थिएट सोडून ते सायगावला गेले. तेथे तीन महिन्यांचा अभ्यासक्रम असलेल्या एका धंदेशिक्षणशाळेत त्यांनी प्रवेश केला. तेथे ते काय शिकले याची नोंद नाही, पण यानंतर त्यांना आचाऱ्याचा पोऱ्या किंवा मदतनीस ही कामे मिळाली, यावरून तो अभ्यासक्रम यासंबंधीच असावा असा अंदाज आहे. १९१२ च्या उन्हाळ्यात एका बोटीवर किचन बॉयचे काम मिळवून ते युरोपला गेले. या प्रवासात त्यांनी पहिल्यांदा आपले नाव बदलून बा हे नाव घेतले.

युरोपात गोऱ्या लोकांशी हो यांचा जो संबंध आला, तसेच बोटीवर गोऱ्या खलाशांशी जो परिचय झाला; त्यावरून त्यांच्या श्रेष्ठपणासंबंधी हो यांचा भ्रमनिरास झाला.

पहिल्या महायुद्धाला सुरवात झाली तेव्हा हो यांनी लंडनमध्ये राहावयाचे ठरविले. दिवसा एका शाळेत बर्फ काढून टाकण्याचे काम त्यांनी मिळविले व रात्री कार्ल्टन हॉटेलमध्ये एका आचाऱ्याचा मदतनीस म्हणून ते काम करू लागले. लंडनमध्ये राहणाऱ्या इतर आशियाई नागरिकांशी त्यांचा संबंध आला व त्यांच्या परदेशी कामगार संघात ते सामील झाले. या संघटनेचे नेतृत्व चिन्यांकडे होते. आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढ्यास या संघटनेने पाठिंबा दिला व त्यातून वसाहतवादविरोधी चळवळीचे पहिले धडे हो यांना मिळाले.

त्यानंतर हो अमेरिकेला गेले व काही काळ हार्लेमध्ये राहिले. निग्रोंचा छळ, लिंचिंग्स त्यांनी पाहिले. अमेरिकन कामगारांचे संपही पाहिले. पुढे मॉस्कोत गेल्यावर त्यांनी निग्रोसंबंधी एक छोटी पुस्तिका लिहिली. त्यात गोऱ्यांच्या वागणुकीवर कडक टीका आहे.

अमेरिकेहून १९१७ किंवा १९१८ साली हो फ्रान्सला परतले. निर्वाहासाठी फोटो रीटचिंगची कामे ते मिळवू लागले. एका समाजवादी वृत्तपत्राच्या अंकातून पुढील जाहिरात नेहमी येत असे : "तुमचे फोटो नगुएन आय क्वॉक यांच्याकडे रीटच करून घ्या. आकर्षक फ्रेमसह आकर्षक फोटोंना ४५ फ्रँक."

## व्हर्सायचे तहाने निराशा

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला आणि शांतता तहाच्या अटी निश्चित करण्यासाठी व्हर्साय येथे परिषद झाली. या परिषदेबद्दल हो यांनी बऱ्याच


आशा बाळगल्या होत्या. अध्यक्ष विल्सन यांची चौदा तत्त्वे म्हणजे सर्वच परतंत्र वसाहतीतील जनतेच्या स्वातंत्र्याची सनद ठरेल, अशी आशा त्यांना वाटत होती. अठ्ठावीस वर्षांच्या या तरुणाने एक काळा सूट व हॅट भाड्याने घेतली व ज्या प्रासादात ही परिषद चालू होती, तेथे तो फेऱ्या घालू लागला. क्रोट, ट्रान्सिल्व्हानियन, कॉकेशियन व तुर्की प्रतिनिधीही त्याच्याप्रमाणेच परिषदेच्या निर्णयांकडे उत्सुकतेने डोळे लावून बसले होते. क्लेमेन्सो, लॉइड जॉर्ज किंवा विल्सन या बड्या नेत्यांपैकी कोणीही होची भेट घेण्यास तयार नव्हते. हो यांचे विनंतीपत्रतरी त्यांच्यापर्यंत पोचले की नाही, की कारकुनाजवळच पडून राहिले, याची शंका आहे. व्हर्साय शांतता परिषदेच्या कागदपत्रांत व्हिएटनाम किंवा अनामचा नामोल्लेखसुद्धा कोठे आढळत नाही.

व्हर्साय तहानंतरच्या फ्रान्समध्ये समाजवादी चळवळीत दोन तट पडले. नेमस्त आणि जहाल. वसाहतींना स्वातंत्र्य दिले पाहिजे हे नेमस्त समाजवाद्यांना मान्य होते, पण फ्रान्सच्या राष्ट्रीय धोरणाच्या कक्षेत हा प्रश्न सोडवावा, असे ते प्रतिपादीत होते. उलट वसाहतींना ताबडतोब स्वातंत्र्य द्यावे या मताचा पुरस्कार जहाल म्हणजेच कम्युनिस्ट गट करीत होते. 'वसाहतींच्या स्वातंत्र्याचे प्रश्नावर तुम्ही कोणती भूमिका घेता हीच कसोटी मी मानतो,' असे हो चि मिन्ह यांनी फ्रेंच समाजवादी पक्षाच्या १९२० च्या नाताळात भरलेल्या परिषदेत प्रतिपादले. या प्रश्नावर कम्युनिस्ट गटाच्या बाजूने त्यांनी मत दिले. ३० डिसेंबर १९२० ला फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. तिच्या संस्थापक सभासदांपैकी हो चि मिन्ह एक होते. तेव्हापासून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांच्या कार्यास सुरवात झाली. फ्रान्स, रशिया, कॉमिन्टर्न (कम्युनिस्ट इंटर नॅशनल) चीन, आग्नेय आशिया आणि शेवटी स्वतःच्या देशात त्यांनी कम्युनिस्ट चळवळ वाढविण्याचे कार्य केले.

## हाडाचा गनिमी नेता

हो चि मिन्ह यांचे जीवन क्रांतिकारकाचे आहे. ते हाडाचे गनिमी नेते आहेत. युद्धात तर गनिमा डावपेचांचा अवलंब ते करतातच, पण नित्याच्या राजकारणातही हेच तंत्र ते अवलंबितात. अनेक साहसपूर्ण व नाट्यपूर्ण प्रसंग या क्रांतिकारकाच्या जीवनात घडले. हो चि मिन्ह मरण पावले; असे फ्रेंच गुप्त पोलिसांनी १९३० पासून अनेकवेळा जाहीर केले. सध्याचे हो व १९३० चे हो या दोन निरनिराळ्या व्यक्ती आहेत असे प्रतिपादले, पण १९२० पासूनचे त्यांचे फोटो पाहिले तर ही एकच व्यक्ती आहे, याबद्दल शंका राहात नाही.

किरकोळ अंगकाठीची व अवघ्या ४ फूट ११ इंच उंचीची ही मूर्ती गेली चाळीस वर्षे व्हिएटनामच्या कम्युनिस्ट चळवळीचे नेतृत्व करीत आहे. हो चि मिन्ह या




**नवे संघर्ष क्षेत्र : आग्नेय आशिया**

त्यांच्या नावाचा अर्थ प्रकाशदाता आणि त्यांचे तेजस्वी डोळे पाहिले, की त्यांचे हे नाव सार्थ असल्याची खात्री पटते.

हो चि मिन्ह अत्यंत साधेपणाने वागतात. स्वदेशात असोत किंवा परदेशांत असोत; खाकी जाकीट आणि विजार, खाकी हॅट व चिनी चपला हाच त्यांचा साधा वेष नेहमी असतो, पण साधेपणा असला तरी त्यात गबाळेपणा, अव्यवस्थितपणा आढळणार नाही. सैनिकाची शिस्त व नियमितपणा त्यांच्या नेहमीच्या जीवनात आहे. कधीही खंड न पडता पहाटे पाच वाजता उठून ते आपल्या टेबलाशी कामात गढलेले असतात. नेहरूंप्रमाणेच ते मुलांचे लाडके नेते आहेत. नेहरूंना मुले “ नेहरूचाचा ” म्हणत, तसे व्हिएटनामी मुले हो चि मिन्ह यांना “ हो चाचा ” म्हणतात.

हो चि मिन्ह अविवाहित आहेत. सारे आयुष्य राष्ट्रासाठी व कम्युनिस्ट चळवळीसाठी त्यांनी वेचले. त्यासाठी कधी प्रकृतीची पर्वा केली नाही. रशियन, चिनी, फ्रेंच, इंग्लिश व व्हिएटनामी एवढया भाषा त्यांना चांगल्या अवगत आहेत.

हो चि मिन्ह यांनी रशिया आणि चीन या दोघांनाही न दुखविता त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवले आहेत. या दोघांनी त्यांना आपल्याच गटात ओढण्यासाठी फारच दडपण आणले तर हे दडपण न जुमानता ते कम्युनिस्ट क्रांतीचा स्वतंत्र मार्ग चोखाळतील व आशियातील टिटो होतील, असा पाश्चात्त्य निरीक्षकांचा अंदाज आहे.

• • •

## □ दुभंगलेला व्हिएटनाम

व्हिएटनामची उत्तर व दक्षिण व्हिटनाम अशी १७ अक्षांश रेषेवर फाळणी १९५४ च्या जिनीव्हाकराराने झाली. दोन वर्षांनी निवणुका होऊन एकीकरण व्हावे, असे त्यावेळी ठरले होते, पण निवडणुका झाल्याच नाहीत. अखेर १९५९ पासून दक्षिण व्हिएटनाममधील अंतर्गत चळवळ वाढविण्यावर हो चि मिन्ह यांनी भर दिला. नगो दिन्ह दि एम यांचे सरकार उलथले गेल्यानंतर दक्षिण व्हिएटनामला स्थिर सरकार लाभलेच नाही. अनेकवेळा लष्करी उठाव झाले. अमेरिकेने लष्करी मदत वाढविली. उत्तर व्हिएटनामच्या लष्करी ठाण्यांवर हल्ले केले, पण खुद्द दक्षिण व्हिएटनाममधील जनता लढायला तयार आहे, की नाही हा खरा प्रश्न आहे.

व्हिएटनामची सध्याची फाळणी ही काही पहिलीच फाळणी नाही. सोळाव्या शतकाचे अखेरीपासून अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दोन्ही व्हिएटनाम जवळजवळ सध्याचेच रेषेवर विभागलेले होते.

दक्षिण व्हिएटनाम तांदळाने समृद्ध आहे, तर उत्तर व्हिएटनाममध्ये खनिजसंपत्ति विपुल आहे. सध्याची फाळणी रद्द होऊन एकीकरण झाल्यानेच व्हिएटनामच्या विकासाचा मार्ग खुला होईल. केवळ व्हिएटनामींवर हा प्रश्न सोपविला, तर तो लौकर सुटेल, पण बडया राष्ट्रांचे हितसंबंध यात गुंतविलेले आहेत, त्यामुळे जर्मनी व कोरियाप्रमाणे व्हिएटनामचीही फाळणी लौकर रद्द होण्याचा संभव दिसत नाही.

# व्हिएटनामी व चीनी भाई भाई नाही

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीशी कम्युनिस्ट चळवळीची सांगड घातल्यानेच हो चि मिन्ह एवढे यशस्वी होऊ शकले. हो पूर्णपणे चीनच्या पगड्याखाली गेले आहेत, त्यांना स्वतंत्र धोरण नाही, अशी टीका केली जाते; पण ती खरी नाही. चीनची मदत ते घेत असले, तरी चीनचे वर्चस्व त्यांनी कधी प्रस्थापित होऊ दिले नाही. कारण इतिहासातील अनुभवाने जनतेत चीनबद्दलच्या तिटकाऱ्याची भावना खोल रुजलेली आहे, याची त्यांना कल्पना आहे. चिनी राज्यकर्त्यांचा लोभ, दुटप्पीपणा, क्रौर्य यांच्या गोष्टी जणू काल घडल्याप्रमाणे व्हिएटनाममध्ये सांगितल्या जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर काही महिने चिनी फौजांनी व्हिएटनाम व्यापला होता. त्या वेळी हलविण्यासारखे होते ते सारे काही चिन्यांनी लुटले; हा कटु अनुभव व्हिएटनामी जनता विसरलेली नाही. व्हिएटनामी व चिनी जनतेच्या ऐतिहासिक मैत्रीची मोहीम कम्युनिस्टांनी सुरू केली होती; पण तिचा एवढा उपहास झाला, की त्यांना ती अखेर सोडून देणे भाग पडले. व्हिएटनामच्या इतिहासात चिनी आक्रमकांविरुद्ध विजय मिळविलेल्या व्हिएटनामी वीरांची नावे उत्तर व्हिएटनाममधील अनेक नव्या कारखान्यांना दिलेली आहेत. अठराव्या शतकात चिनी सेनेचा पराभव करणाऱ्या क्वांगटुंग बादशहाचा वाढदिवस व्हिएटनामी कम्युनिस्ट दरवर्षी साजरा करतात.

सुरुवातीस काही काळ जमीन सुधारणांच्या बाबतीत चीनचे अनुकरण हो चिमिन्ह यांनी केले; पण या बाबतीत त्यांचे धोरण डोळस आहे. चीनची लांब उडी व कम्यून्सचे अनुकरण उत्तर व्हिएटनाममध्ये करण्यात आलेले नाही, हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

● ● ●

## ● राजकारणात भाग घेणारे न्यायालय

न्यायाधीश हा राजकारणापासून अलिप्त असतो, ही कल्पना भारतीय माणसाच्या मनात रुजलेली आहे; पण अमेरिकेत लोकशाहीचा पुरस्कार व तिचे जतन करण्यासाठी तेथले सुप्रीम कोर्टदेखील देशाच्या राजकीय जीवनात प्रसंगी हिरीरीने भाग घेत असते. अशी माहिती काही दिवसांपूर्वी अमेरिकेच्या डेमोक्रॅटिक पक्षाचे माजी अध्यक्ष श्री. स्टीफन मिचेल यांनी दिल्लीला एका भाषणात दिली. वैधानिक विधिनिषेध, मानवी स्वातंत्र्य व समता, नागरिकत्वाचे अधिकार इत्यादि महत्त्वाच्या बाबतीत अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या राजकारणाला मार्गदर्शन करणारे निवाडे दिले आहेत. त्यातल्यात्यांत वंशभेदाचे उदाहरण विशेष उल्लेख करण्यासारखे आहे. १९५४ साली वंशभेदाच्या एका खटल्यात सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला, त्यानेच सध्याच्या वंशभेद-निर्मूलनाच्या राष्ट्रव्यापी चळवळीला प्रथम चालना दिली. मात्र राजकारणात सक्रिय भाग घेण्याबद्दल सुप्रीम कोर्टाची एकीकडून प्रशंसा होते, तर दुसरीकडे त्याच्यावर टीकाही होते.

अमेरिकन राजकारणावरील व्यापारीवर्गाच्या प्रभावावर देखील मिचेल यांनी बराच प्रकाश टाकला. अमेरिकेतील व्यापारीवर्ग राजकारणात अधिकाधिक रस घेऊ लागला आहे, इतकेच नव्हे तर देशाच्या राजकारणावर त्याचा आता बराच प्रभाव पडू लागला आहे. पाच वर्षांपूर्वी तेथील चेंबर ऑफ कॉमर्सने व्यापारी मंडळींना राजकारणाकडे जातीने लक्ष घालण्यास प्रवृत्त करण्याची मोहीम आरंभली व त्याचाच परिणाम म्हणजे गेल्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी उद्योग-धंद्यांतील प्रमुख मंडळींनी जॉन्सन यांना उघडउघड पाठिंबा दिला. या काळात मोठमोठ्या उद्योगपतींनी आपल्या मंडळींना राजकारणात सक्रिय भाग घेण्यास प्रोत्साहन दिले. इतकेच नाही, तर तेलकंपन्या व जनरल इलेक्ट्रिकसारख्या इतर मोठ्या कंपन्यांनी तर राजकीय शिक्षणाचे वर्गही चालविले. अमेरिकन जनतेलाही आश्चर्यचकित करणारी गोष्ट म्हणजे अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी डेमोक्रॅटिक पक्षाचा प्रचार करण्यासाठी व्यापारी मंडळींची एक समितीही स्थापन करण्यात आली.

मोठमोठे उद्योगपती अशारीतीने राजकारणात भाग घेऊ लागले, म्हणजे राज्यकर्त्यांच्या धोरणावर दडपण येत नाही काय ? होय, येते; पण ते फारसे टिकत नाही. अमेरिकेच्या राजकीय व राष्ट्रीय जीवनात निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या मंडळींना जसे स्थान आहे, तसेच व्यापारीवर्गालाही आहे, त्याहून कमी नाही व अधिकही नाही. याचे कारण अमेरिकेतील राजकीय पक्षांना एखाद्या गटाचा पाठिंबा

नको असतो, तर राष्ट्रीय दर्जा हवा असतो. जनतेच्या कुठल्या तरी एका विभागाच्या आधारावर व्हाईट हाउस गाठण्याची आशा कुठल्याच राजकीय पक्षाला करता येत नाही. शिवाय व्यापारीवर्गाप्रमाणेच अमेरिकन मजूर संघटनाही काँग्रेससाठी (संसदेसाठी) आपले उमेदवार उभे करून निवडून आणतात व या प्रतिनिधींच्यामार्फत आपल्या अधिकारांचे व हिताचे रक्षण करतात.

अमेरिकेतील लोकशाही यंत्रणा द्विपक्षीय पद्धतीने राबविली जाते व त्यामुळे देशातील आबालवृद्धांना राजकारणात भाग घेण्याची संधी मिळते. मात्र पक्षाच्या यंत्रणेला सरकारी पाठिंबा दिला जात नाही. अमेरिकन राजकारणावर परिणाम करणाऱ्या आधुनिक गोष्टींपैकीं सध्या सर्वांत क्रांतिकारक गोष्ट म्हणजे टेलिव्हिजन. अमेरिकन जनता आता शहरांत एकवटलेली नसून, लहान लहान गावांतून पसरली आहे व त्यामुळे उमेदवार व मतदार यांतला संबंध दुरावला आहे. ही उणीव आता टेलिव्हिजनने भरून काढली आहे. कारण टेलिव्हिजनवर भाषण करणाऱ्या उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलून् पैलू मतदाराला आता घरबसल्या ऐकता येतो.

## ● बृहद् अर्थशास्त्र

भारतीय अर्थकारणाला आधुनिक मार्गदर्शन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे काही प्रकांड पंडित आपल्या सरकारतर्फे बोलावले जातात. त्यांच्यात प्रा. सर रॉय हॅरॉड या ब्रिटिश तज्ज्ञाचा क्रमांक फार वर लागतो. जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कीन्स याचे हे शिष्योत्तम व चरित्रकार. थोड्याच दिवसांपूर्वीच्या एका भारत-भेटीत हॅरॉड म्हणाले, कीन्सचे आर्थिक तत्त्वज्ञान अजूनही खोटे ठरलेले नाही. हल्लीच्या अर्थकारणातील विकास तत्त्व हे कीन्सच्याच गतिशील ('डायनॅमिक') अर्थव्यवस्थेच्या तत्त्वावर उभारलेले आहे. 'बृहद् अर्थकारण' ('मॅक्रो-इकॉनॉमिक्स') ही कल्पना प्रथम कीन्सनेच पुढे मांडली.

हिंदुस्थानच्या अर्थनीतीचे काय ? हिंदुस्थानात चलनवाढ झाली आहे, पण दक्षिण अमेरिकेतील काही देशांत ती जेवढी झाली आहे, तेवढी झालेली नाही. हिंदुस्थानला सध्यातरी मुक्त व्यापारपद्धतीत भाग घेता येणार नाही, हे उघड आहे; " पण भारताने रुपयाचे अवमूल्यन करू नये. "

सोन्याचे मात्र आता जागतिक पूनर्मूल्यन व्हायला हवे. सोन्याचा भाव दुपटीने तरी वाढला पाहिजे. " सध्याचा भाव आता अगदीच जुनाट झाला. देशादेशांतल्या आर्थिक व्यवहारासाठी लागणाऱ्या साधनांचा हल्ली जो अतीव तुटवडा भासतो तो सोन्याच्या भाववाढीने काहीसा कमी होऊ शकेल.

● ● ●

# अंगांतल्या व हवेंतल्या

# उष्णतेच्या तक्रारीं साठीं

# पर्ल काढा कुटुंबांत सर्वांच्या उपयोगी पडतो

असा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव आहे. सर्व अंग आंतल्या आंत रसरसणें, डोळ्यांची व हातापायांच्या तळव्यांची जळजळ, उन्हाळ्याचा त्रास, पचनेंद्रियें कमजोर होऊन वारंवार अपचन, पोट दुखणें-फुगणें-जड होणें, शौचाला केव्हांच साफ नसणें, नेहमीं अगदीं थकल्यासारखें वाटणें वगैरे उष्णतेच्या तक्रारी शीतल, शक्तिवर्धक, आरोग्यदायक पर्ल काढा जलद दूर करतो. काढा या नावामुळें घाबरण्याचें कारण नाहीं. पर्ल काढा रुचदार लागतो. वर्षांतून एक दोन वेळां पर्ल काढ्याच्या ४।५ बाटल्या घेतल्यास प्रकृती उत्तम राहते. पर्ल काढा पुरुषांप्रमाणेंच नाजुक प्रकृतीच्या स्त्रियांना व मुलांना विशेष उपयोगी पडतो. स्त्रियांनीं गरोदरपणीं सुद्धां निर्धास्त घ्यावा. केव्हां दिवसपाळी केव्हां रात्रपाळीमुळें हटकून होणारें अपचन, पित्त, मलावरोध घालवून प्रकृती चांगली ठेवण्यासाठीं पर्ल काढा पुष्कळ मंडळी वापरतात. आपल्याकडच्या उष्ण हवेंत साहजिक उद्भवणाऱ्या उष्णतेच्या तक्रारींसाठीं पर्ल काढा घ्या.


# उष्णतेच्या तक्रारीं चा अनुभविक उपाय पर्ल काढा

पर्ल कंपनी, मुंबई २७.



Stuca 9/64

## शेज



रस्त्यांवरी धुळीचा आक्रोश ऐकवेना
मी कोण या घरेचा माझे मला कळेना
ही एक येरझार स्पर्शाविना उमाळा
नि:शब्द आणभाका ओसाड पावसाळा
पायात गुंतलेली घायाळ स्वप्नवाट
अंधूक पावण्यांचे भिजले उन्हात काठ
आच्छादल्या तृणांची माझ्या कुशीत शेज
हे रक्त चेतवाया यावी तुटून वीज !

सुधाकर देशमुख

## रस्ता

ज्या रस्त्याने मी जात आहे त्या रस्त्याने तू येऊ नकोस
लाचारीच्या फुग्यामागे माझ्यासारखीच बहकू नकोस
बालपणच सारे शापित, अलिखित, अशी काही गहाणपत्रे
प्राणांची दोरी पोटाहाती खेळविते मला करून कुत्रे...
रडण्यातील खोटेपण... थिटेपण हसण्यातील निष्क्रिय जीवन
मन केव्हाच पिचून गेले... स्टोव्ह दुरुस्तीला टाकून टाकून
प्रश्नचिन्हांचे ओझे पेलावे कसे कणा साफच ठेचलेला
किनाऱ्यावर वाळू किती..ठेका तिचाहि, थोरामोठ्यांनी घेतलेला...
ज्या रस्त्याने मी जात आहे त्या रस्त्याने तू येऊ नकोस
तुझ्या खांद्यावरल्या तळपत्या किरणाला हा रस्ता दावू नकोस
त्याच्यासाठी पितो मी उन्हाळे..हिवाळे कातडीतच जिरवतो
घामाच्या खाऱ्या बरसातीत कावळ्यासारखा न्हाऊन घेतो..
मंद वाऱ्याचे गाणे... उखाणे, भरतीओहोटीचे चढउतार
चंद्र माथ्यावर झिरपणारा भट्ट्यांचा उग्र वास अजगरगार
निर्विकार हा रस्ता ह्यांच्यातून जाणारा..हलकट गाणे गाणारा
येणारांना हूल देऊन सर्वस्वाला तिळातिळाने पिणारा..
नि:श्वासांनी मालवू नकोस स्नेहदिवे मिणमिणणारे डोळ्यांतले
ऊन अश्रु जप त्यांना, हुंदका तस्सा शब्द थोपव ओठांतले
क्षितिजापार रस्ता चालणारा मी..नजर मात्र ढाळू नकोस..
तुझ्या डोळ्यांतच रस्ता हा तरी त्यावर येऊ नकोस !

केशव मेश्राम



# पीस

जयश्री खिरे

**भाई तिच्याजवळून चालत होते. तिला ते नको वाटलं. ती दुरून चालू लागली. अधिक अंग चोरत...**

गाडीची लय कमी होत गेली. स्टेशन जवळ आलंस् वाटलं, म्हणून ती उठली. दाराजवळ गेली. किंचित पुढे. पावसाचा सपकारा तोंडावर सपकारला नि झटकन् दोन पावलं मागे पडली. ओलेपणानं शहारली. शहारण्यातही सुख. ते सुख तिच्या ओठाबाहेर ओहळू पाहात होतं. इथं येताना गाडीत ती चढली, तेव्हा तिनं ते बरोबर घेतलं होतं. आता ती उतरणार होती, ते बरोबर घेऊन आणि लोकलच्या साऱ्या प्रवासात ते तिच्या अवतीभवती होतं. इतका वेळ धुकं तरंगत होतं. हळूच त्याचं धुरकट चांदीपण विरघळलं आणि दिसलं हिरवंगार. त्या हिरव्याकंचावर स्वप्नातून ओघळून स्थिर आलेले रंगीबेरंगी ठिपके...ठिपक्यांची फुलपाखरं...भवती भवती... विनआवाजी भिरभिरणारी. पाऊस जोरात रपरपत होता आणि आता तिला पावसाची जाग आली. इतका वेळ नुसत संगीत...मुलामय...लहरून विहरणार... कुठलंसं निळं निळं आकाश...रंगीत पक्ष्यांना उचलून डोळ्यांसमोर धावत येणारं... आणि आता पाऊस सपकारणारा.

गाडी थांबता थांबता तिनं पदर डोक्यावरून लपेटून घेतला. पावसाची पर्वा न करता ती पटकन् खाली उतरली. एकदोन पावलं पुढं पडेपर्यंत ती पार ओलीचिंब झाली. परंतु ओलेचिंबपणाचं तिला काही नाही. शरीराची सवय म्हणून तिनं जवळच असलेल्या शेडचा आश्रय घेतला. शेडमध्ये शिरल्याबरोबर तिनं आधी आपल्या चिमुकल्या ओल्या रुमालानं चेहऱ्यावरचं पाणी पुसलं. मग उघड्या हातावरचं पाणी रुमालानं निपटून टाकण्याचा ती प्रयत्न करू लागली. मग तिनं तो चिमुकला ओला बोळा नाकाशी नेला. ओला सुगंध घेऊन ती स्वतःला विसरू लागली. सुगंध सारं सारं भारावू लागला. तिचं लक्ष स्टेशनवरच्या मोठ्या घड्याळाकडे गेलं. साडेबारा वाजून गेले होते. घराचा विचार मनात आला, तेव्हा कुठे तिला घरी पोचण्यास उशीर झाल्याचं उमजून आलं. आता तिच्या लक्षात आलं. तिच्याजवळ छत्री नव्हती. घर अर्धा–पाऊण मैल दूरवर.

तिनं वळून इकडे तिकडे पाहिलं. तिला घेऊन येणारी गाडी निघून गेलेली. दूर-



वर; पण गाडी गेल्याची तिला खंत नव्हती. शेडमध्ये तुरळक दोनचार लोक दिसत होते. आपल्या भिजलेपणाची तिला जाणीव आली. तिनं प्लॅटफॉर्मवर पावसात वाकून पाहिलं. एक–दोन काळ्या छत्र्या पुढे जाताना दिसल्या तेवढ्याच. बाकी पावसाच्या वेगानं सरकणाऱ्या लाटा. शेडच्या टोकावरचं ओघळणारं पाणी खांद्यावर ओघळलं. ती बाजूला झाली. किंचित बावरल्या चेहऱ्यानं तिनं एकदा भिजलेल्या स्वत:कडे आणि पुढे जाणाऱ्या घड्याळाकडे पाहिलं. मग तिनं ओलागच्च झालेला पदर डोक्यावरून लपेटून घेतला आणि ती पुढे झाली. अस्फुट हसत.

पुढे पाऊल टाकताना तिनं दूरवर प्लॅटफॉर्मच्या उतरणीकडे पाहिलं नि ती थबकली. रेनकोट घातलेली, हातात छत्री घेतलेली कुणीतरी आकृती प्लॅटफॉर्मच्या उतरणीवर पावसात उभी होती. तिनं पुन्हा पाहिलं. ती आकृती हात उंचावून तिला काही सांगत होती. पुढे जाण्याऐवजी ती एकदम मागे सरकली आणि मग जागच्या-

जागी उभी राहून त्या आकृतीकडे स्थिर नजरेनं पाहू लागली. त्या व्यक्तीने हात उंचावून येण्यासंबंधी केलेली खूण आता तिला स्पष्ट दिसली. शेडमध्ये कुणीच नव्हतं. ती खूण आपल्यालाच असावी, पण पावसात त्या रेनकोटानं वेढलेल्या माणसाची तिला ओळख पटेना. हात उंचावून केलेली खूण कदाचित दुसऱ्या कुणाला असेल असंही तिला वाटू लागलं. तिनं मुद्दाम तसा समज करून घेतला. आपल्याला हात पालवणारा इथं येणार नाही. तो तर गेला विरुद्ध दिशेनं. ती स्वत: सांगू लागली. तिला मग काहीच सुचेना. तेव्हा त्या दिशेकडे न पाहता ती दुसरीकडे पाहात उभी राहिली. तिला वाटलं आपण लक्ष देत नाही, हे पाहून ती व्यक्ती निघून जाईल. तिच्या नकळत पुन्हा तिची नजर तिकडे वेधली आणि ती दचकली. ती व्यक्ती हातात छत्री धरून तिच्याकडेच येत होती.

ती व्यक्ती आणखी काही पावलं पुढे येते न येते तोच तिनं त्या व्यक्तीला ओळखलं. आपल्या मघाच्या भीतीचं तिला हसू आलं. भाई...भाई तिच्याकडेच येत होते. तिनं नजर दुसरीकडे वळवली. जवळजवळ येणाऱ्या भाईंचा तिला काहीसा संकोच वाटला. आता हे विचारतील कुठं गेली होतीस? एवढा उशीर? पावसाळा असून छत्री बरोबर घेतली नाही? त्यांच्या प्रश्नांना ती उत्तर देणार होती, पण वरवर...मनातून तिला ते प्रश्न नको होते. शिवाय आज तरी...आता ...निदान ह्या वातावरणात तिला आपल्याशीच खूप बोलायचं होतं. काही वेळापूर्वी तिनं घालवलेल्या क्षणांविषयी मनात खूप साचून होतं. भाईंच्या प्रश्नांना उत्तर देताना एखादवेळी मनाचा तळच ओठाबाहेर येईल, ही तिला सारखी भीती.

हातात छत्री नव्हती ते बरंच. पावसात अगदी मनसोक्त भिजत ती घरी जाणार होती. छत्री असती तर छत्रीबाहेरून येणारे पावसाचे सपकारे चुकवावे लागले असते. वाऱ्याने ओढ घेणारी छत्री सांभाळावी लागली असती. मग स्वत:शी बोलण्याची एकतानता भंगली असती. छत्री नव्हती. ती अगदी नि:शंक भिजत पावसात नहात घरी जाणार होती. शिवाय तिला अशी पावसात नाहलेली; पाण्यानं निथळलेली पाहून उशिरा घरी आल्याबद्दलचा आईचा राग काही वेळ तरी निवणार होता. आई तिच्यावर रागावणार होती. लटकंच. त्या रागामध्ये ती भिजून आल्याची काळजी अधिक. न बोलता...न उच्चारता तिला आईला सांगता येणार होतं...मी मुद्दाम उशीर केला नाही...उशीर करायचा असता तर...पाऊस कमी होईपर्यंत थांबले नसते का? भिजत कशाला आले असते?

पण आता ते काहीच जमणार नव्हतं. इच्छा असूनही तिला पावसात भिजायला मिळणार नव्हतं. भाई तिच्याजवळ येऊन उभे होते. त्यांच्या प्रश्नांना तिनं उत्तरं दिली. काहीशी अंधुक. आपण काय बोललो हे तिचं तिलाच उमगलं नाही. मग ते तिला 'चल' म्हणाले. ती घोटाळली.

'नको, मी पाऊस थांबल्यावर येते. आज रविवार आहे, तेव्हा घरचं कुणीतरी

माझ्यासाठी छत्री घऊन येईलच. तुम्ही जा.' तिनं टाळाटाळ केली. तिला माहीत होतं भाईपुढे आपलं काही चालणार नाही. ते तिच्या शेजारीच राहात होते. तिच्या जिवलग मैत्रिणीचे ते वडील. त्यांच्याबरोबर जायला तिनं नकार दिला तर तिच्या घरी ते आवडणार नव्हतं. शिवाय अशा पावसात, त्या जवळजवळ निर्मनुष्य अशा स्टेशनवर ते तिला एकटीला ठेवून पुढे जाणं शक्य नव्हतं.

नाइलाज झाल्यासारखा चेहरा होऊन ती त्यांच्याबरोबर चालू लागली. रस्त्याला लागल्यावर आपण मोकळं बोलत आहोत, याचा ती देखावा करू लागली. मग तिच्या लक्षात आलं. तिच्या कल्पनेप्रमाणे भाईंनी तिला खोदून काही विचारलं नव्हतं. आडवेतिडवे प्रश्न केले नव्हते. ती स्वतःशी हसली. हसता हसता काही वेळापूर्वीच्या आठवणी गोळा झाल्या. ती स्वतःशी बोलू लागली. अगदी मूक. त्या मूकतेत पावसाची साथ. चिखलात होणारा पावलांचा अस्पष्ट आवाज. रस्त्याच्या दोन्ही बाजूंकडून वाहणाऱ्या पाण्याची खळखळ. आपण छत्रीतून अर्ध्यापेक्षा अधिक बाजूला आलो आहोत. आपल्या कपड्यांचा, शरीराचा अर्धा भाग पावसात भिजून निथळतो आहे याचं तिला भान राहिलं नाही.

'हे काय; तू तर पावसात अगदी भिजते आहेस. इकडे ये. छत्रीतून चाल.' भाईंच्या शब्दांनी तिनं वर पाहिलं. आधी भाईकडे, मग स्वतःकडे. तिच्या ब्लाऊजची उजवी बाही, साडीचा उजवा भाग, केसाचा उजवा भांग—पार भिजून निथळत होता. आपल्या अर्ध्या भिजलेल्या, भिजून उघड्या पडलेल्या स्वतःची भाईंसमोर तिला एकाएकी प्रथमच लाज वाटली. तिनं पुन्हा पदर लपेटून घेतला. खाली मान घालून ती चालू लागली. संकोचत, शक्य तो अंग चोरत. तिचा देखावा गळून पडला.

'माझा रेनकोट देतो. घाल.' भाई तिला म्हणत होते.

'नको...नको'. आता तिला विलक्षण लाज वाटू लागली. कशाला आलो आपण यांच्याबरोबर.

ती चालतच होती. भाई चालत होते, पण आता ती स्वतःला हरवून बसली नव्हती. संकोचत, अंग चोरत ती पावलं टाकत होती. ती भिजू नये म्हणून भाई शक्य तो तिच्याजवळून चालण्याचा प्रयत्न करत होते. तिला आता स्वतःचं आश्चर्य वाटत होतं. भाई...तिच्या मैत्रिणीचे वडील...लहानपणापासून अगदी तिला आठवत होतं. त्याआधीपासून तिनं त्यांना पाहिलं होतं. तिची आई सांगत होती त्यावरून नीलाबरोबर त्यांनी तिलाही अंगाखांद्यावर खेळवलं होतं. तिचे लाड केले होते. तिची चेष्टा केली होती. तिला हसवलं होतं. तिला रडवलं होतं. पण संकोचाची, परकेपणाची ही जाणीव तिला यापूर्वी कधीच झाली नव्हती. आजच. .आजच असं......

तिनं समोर पाहिलं. अजून बराच रस्ता संपायचा होता. भाई होते म्हणून रस्ता लांबत होता. नसते तर हाच रस्ता किती चटकन् संपला असता, पण तरी तिच्यासाठी भाईंना सावकाश चालावं लागत होतं. नाहीतर ते केव्हाच घरी पोहोचले

असते. ती भरभर चालायचा प्रयत्न करू लागली. चालता चालता पुन्हा ती छत्री-बाहेर जाऊ लागली अन् भिजू लागली. भाई पुन्हा तिला म्हणाले, 'अग इकडून चल ! का भिजतेस पावसात ! आजारी पडायचंय् ?'

तिला जणू ते ऐकायचं नव्हतं. ती हट्टाने दूर चालू लागली. भाईंचा जिव्हाळा, त्यांची माया, त्यांचं वात्सल्य, वडिलांसारखी त्यांची हुकमत तिला पटत होती, पण बुक्यानंतरच्या स्पष्टतेनं तिचं शरीर तिच्याविरुद्ध हट्टी झालं होतं. छत्रीत जरा भाईंच्या बाजूला गेलं की तिचं शरीर, तिची चाल आपोआप उजवीकडे कलत होती. जणू शरीरापुढे तिचं काही चालत नव्हतं. वरवर ती भाईंना म्हणत होती, 'असू द्या भाई, मला आवडतं पावसात भिजायला.'

भाईंनी तिच्याकडे पाहिलं. त्यावेळी तिला त्यांच्या नजरेतला भाव कळला. 'अजून पोरपण गेलं नाही तुझं.' असं त्यांची नजर म्हणू पाहात होती, पण भाई ...हे पोरपण नाही...कशाला सांगा त्यांना ? सांगता येणार नाही. कारण 'हे काही वेगळं आहे. नवं आहे. अनोळखी आहे. आपल्याला माहीत नसणारं.'

तिच्या हट्टीपणापुढे भाईंचं काही चालत नव्हतं. ती भिजू नये म्हणून ते शक्यतो तिच्याजवळून चालत होते. न बोलता. निःशब्द. तिला वाईट वाटलं. स्वतःचा राग आला, पण आज तिच्यापुढेच काही चालत नव्हतं. एकाएकी वेड्यासारखं विचित्र झालं होतं. अबोल झालेल्या भाईंशी ती बोलायचा प्रयत्न करू लागली. त्याचवेळी ती स्वतःशी सारखं म्हणू लागली, 'असं कधी झालं नव्हतं...असं कधी झालं नव्हतं.'

तिच्याशी बोलता बोलता भाई चालत होते. तिला बरं वाटलं. ते आपल्यावर रागावले नाहीत तर...आपल्याला उगीचच वाटलं. तिच्याशी बोलत तिच्याजवळून चालणाऱ्या भाईंचा हात नकळत तिच्या डाव्या दंडाला स्पर्शून गेला. ती चमकली. पटकन् दूर झाली. संकोचून चालू लागली. मघासारखी भिजत. तिनं भाईंकडे पाहिलं. तिचं संकोचून दूर चालणं त्यांच्या लक्षात आलं नव्हतं. ते थांबले नव्हते. काय झालं ? म्हणून त्यांनी तिला विचारलं नव्हतं. ते बोलत पुढे चालले होते. ती चालली होती.

ती चालली होती, पण आता तिचं बोलणं तुटलं होतं. पुन्हा मघाचं, पुन्हा स्वतःशी बोलणं. त्यात आणखी कशाची भर. भाईंचा स्पर्श आज आपल्याला परका वाटला. असं कधी झालं नव्हतं. ती त्यांच्या घरी वावरली होती. अगदी निःसंकोच. अशी वेळ...कितीतरी वेळा...तेव्हा जाणवलं नाही...आज जाणवलं, का ?...काय ?

तिला मग आठवण झाली. ती हसली. ओठाच्या कोपऱ्यात. दोन तासांपूर्वीची ती आठवण तिला मोहरून गेली. आज ती त्याला भेटली होती. तिच्या प्रियकराला चोरून. आज प्रथमच त्यानं तिचा हात धरला होता. त्याचा पहिला स्पर्श आज तिनं अनुभवला होता. तो स्पर्श तिच्या सर्वांगावर त्वचेसारखा अंथरून होता आणि त्या अंथरण्याचा एक सुंदरपणा, एक सुवासिकता, ती पावसात नहात घरी जाणार

होती. त्या सुवासिकतेत. त्या सुंदपणात.

ती हसली. आता अधिक मोकळं. तिच्या लक्षात आलं. नुसत्या हाताच्या स्पर्शात आज तिनं त्याला, तिच्या प्रियकराला जणू सर्वस्व दिलं होतं. तो स्पर्श...हात धरून दाबल्याचा स्पर्श...तिच्या रोमारोमात जागा होता...सारखा निश्वसत होता. माईचा स्पर्श होताच ती आज दचकली...धास्तावली. त्यात परकेपण वाटलं. त्यांच्या-बरोबर एका छत्रीत चालताना संकोच वाटला. लाज वाटली. कधी नव्हे ती आज त्यांच्याबरोबर हट्टाने वागली. आढयतेने वागली. त्याचं कारण तिला आता कळत होतं.. जाणवतं होतं.

तिच्या मनःप्रियाच्या स्पर्शाचं हे नवं लेणं ! कुणाला न सांगता गुपित ठेवून ती आज अभिमानानं वागवत होती. तिचं तिलासुद्धा तिच्या शरीरानं कळू दिलं नव्हतं. आता तिला ते जाणवलं होतं. यापुढे कुणाही पुरुषाचा स्पर्श तिला परका भासणारा ...कितीहि जवळचा असणारा पुरुष तिला परपुरुष वाटणार होता. त्याच्याशी ती संकोचून वागणार होती...संकोचून बोलणार होती.

तिनं वर पाहिलं. माई तिच्याजवळून चालत होते. तिला ते नको वाटलं. ती दुरून चालू लागली. पूर्वीपेक्षा अधिक अंग चोरत. रस्ता लवकर संपत का नाही याचा तिला राग आला. तिनं समोर पाहिलं. तिचा चेहरा उजळला. तिची बहीण तिच्या-साठी छत्री घेऊन समोरून येत होती. ती माईंच्या छत्रीतून बाहेर येऊन धावत वहिणीजवळ तिच्या छत्रीत शिरली.

मोठचानं खळखळून हसत ती वहिणीला म्हणाली, ' किती ग हा पाऊस ! मेल्यानं अगदी छळलंय् नुसतं ! '

● ● ●

पोरवाल
नेत्रांजन काजळ टूथ पावडर
पोरवाल आणि कं., टिळक रोड, पुणें २.

# गंमत

**सौ. शरदिनी मोहिते**

नाही म्हटलं, तरी आज उठल्यापासून विशाखा त्रासल्यासारखी झाली होती...

रात्री निजायला उशीर झाला होता. छोटया सुप्रियेनं चांगलंच जागवलं होतं तिला. काय हट्ट आला होता कोणास कळे, सुप्रिया अकरा, बारा वाजून गेले तरी 'जो जो' करायला राजी नव्हती ... विशाखेचा तिला निजवण्याचा प्रत्येक प्रयत्न फोल व्हायचा. शेखरनं सुप्रियेला चांदण्यात फिरवूनही आणलं... कशाचा उपयोग झाला नव्हता. सुप्रियेनं खेळणं म्हणजे खेळणंच मनांत धरलं होतं. ती इतकी खेळली इतकी खेळली, की दमून जाऊन स्वतःचे पाय स्वतःच दाबत दाबत कलंडली आणि झोपी गेली...

निजायला उशीर झाल्यानं विशाखेला अगदी मनापासून वाटत होतं, की सुप्रियेनं सकाळी लवकर उठू नये. जरा जास्त वेळ आपल्याला निजायला मिळावं... पण बाईसाहेब उठल्या नेहमीप्रमाणेच पहाटे पाचला आणि जागं झाल्यावर बोचकारे घेऊन घेऊन तिनं आईलाही उठवून ठेवलं.... नाइलाजानं जागं होऊन विशाखेला सुप्रियेबरोबर खेळावं लागलं. पुन्हा तिला दूध पाजणं वगैरे सकाळच्या सर्व गोष्टी ओघानं आल्याच... आणि झाली काय गंमत. आज बंब काही केल्या पेटायला राजी होईना... तीनचार वेळा पेटवण्याचा प्रयत्न केल्यावर अशी परिस्थिती निर्माण झाली, की आता बंब पेटायला हरकत नाही...

तेव्हा हुश्श करीत विशाखेनं इकडे तिकडे नजर टाकली आणि स्वयंपाकघरातला पसारा आणि रात्रीची खरकटी भांडी आ वासून तिच्याकडे पाहू लागली... आता हे सर्व आवरायचं केव्हा, म्हणत विशाखा कपाळाला हात लावून बसली. भांडी घासायची म्हणजे इतक्या लवकर सुप्रियेला गार पाण्यात खेळण्याची पूर्ण मुभा देण्यासारखं होतं... तेव्हा पडू दे सारं तसंच, शेखर उठल्यावर सुप्रियेला त्याच्या ताब्यात देऊन मगच कामाला लागावं, असा विचार करून विशाखा सरळ घरापुढच्या बागेत सुप्रियेला घेऊन आली आणि तिला खेळवत बसली....

गंमत अशी, की बाहेरची प्रसन्न सकाळ बघून विशाखेला बरं वाटलं आणि पलीकडच्या बंगल्यातल्या मालतीबाईंचं बोलणं आठवलं, तेव्हा तर तिची उरली-सुरली चीड नाहीशी झाली...



मालतीबाईंनी विशाखेला काल अगदी आश्वासन दिलं होतं, की आमच्याकडे काम करणाऱ्या रमाबाईंची बहीण कसंही करून तुझ्याकडे पाठवून देते. तुझ्याकडचं सर्व घरकाम अगदी सहज करू शकेल रमाबाईंची बहीण.

विशाखा मग शांत मनानं बसली–बागेत सुप्रियेला खेळवत–एकीकडे रमाबाईंची आणि त्यांच्या त्या बहिणीची वाट बघत. सातच्या सुमाराला तिला आपल्या बंगल्याकडे येत असलेल्या दोघी दिसल्या. त्या दोघी अधिक जवळ आल्यावर रमाबाईंना सहज ओळखलं विशाखेनं. त्यांच्याबरोबरची ती मुलगीलीशी बाई मात्र त्यांची बहीण असेलसं वाटत नव्हतं... विशाखा अधिक विचार करत बसण्यापूर्वीच त्या दोघी बागेत आल्या.

" वयनी, तुमाला बाई पायजे होती ना ?"

" हो ना !"

" ही काम करेल तुमच्याकडं."

" रमाबाई, ही कोण, कुठली, एवढं तरी सांगा... ही काही बहीण दिसत नाही तुमची..."

" हां. बरावर. ही माजी भैन न्हाई, नवी शेजारीण हाय."

" अस्सं ! ... नाव काय हिचं ?"

" हिचं नाव लयला..."

" लयला ?" किंचित दचकून विशाखेनं लयलेकडे पाहिलं... लयला ! ... लयला गावठी होती, तरी नावाला शोभेल असा नखरा तिनं केला होता... लयला साधंच परंतु स्वच्छ नऊ वारी पातळ अगदी चापूनचोपून नेसली होती. केसबीस विंचरलेले दिसत होते, पण मुद्दाम सौंदर्यबटा काढून तिनं आपला चेहरा मोहक करण्याचा प्रयत्न केला होता. कुंकू कोरून बदामाच्या आकाराचं लावलं होतं... गरिबीत जेवढं करता येईल, तेवढं करून घेतलं होतं.

विशाखेनं रमाबाईंना एका बाजूला घेऊन विचारलं, "रमाबाई ! ही रंभा मोलकरणीचं काम करील ?..."

" वयनी, मी पाहते ना रोज, तिला कामाचा उरक दांडगा..."

" पण रमाबाई, मी सांगून ठेवते, आज मला नव्हं आहे, म्हणून तिला ठेवते कामाला. जर काही वावगं दिसलं तर तिला काढून टाकीन हं !"

" बघा वयनी. कोण कोणाच्या पोटात शिरतं का. सुरवातीला तरी तिच्यावर नजर ठेवूनच असा... बरं, मी जाते. वयनी वाट बघत असतील ना", असं म्हणत रमाबाई निघाल्या. जाताजाता मोठ्यानं ओरडून त्या म्हणाल्या, " वयनी, काय काय कामं करायची ती सर्वी सांगून ठिवा... आणि तू पण पैशाचं नीट बोलून घे ग..."

रमाबाई गेल्या आणि विशाखेचं लक्ष एकदम सुप्रियेकडे गलं... पोरटीनं बागेतल्या चिखलानं कपड्यांवर, चेहऱ्यावर, सगळीकडे अगदी व्यवस्थित रंगरंगोटी करून घेतली होती... तिला उचलून घेत विशाखा म्हणाली, " तू आत चल ग. हिला आंघोळ घालता घालता सांगते सर्व काही..."

विशाखा सुप्रियेला आंघोळ घालत असताना दोघींचं बोलणं झालं. लयला तशी बोलायला चांगलीच अघळपघळ दिसली. ताड्‌दिशी तिनं विशाखेला विचारलं, " वयनी, साहेब उठलं न्हाईती अजून ?"

विशाखेला असा संताप आला या अगोचरपणाचा. ती म्हणाली, " का ग ?"

तशी जीभ चावत सावरून घेत लयला म्हणाली, " म्हंजी लोटून काढायच्या म्हनतायना साऱ्या खोल्या...."

" आधी भांडी घे घासायला पाहू. मला लवकर लागतात भांडी स्वयंपाकाला..." विशाखेनं सुप्रियेला टॉवेलनं पुसायला सुरवात केली... लयला भांडी घासायला लागली, तशी मग सुप्रियेला घेऊन विशाखा आत आली.

शेखर एव्हाना उठला होता. सकाळची ताजी वर्तमानपत्रं वाचत होता. सुप्रियेचं आवरून होताच तिला शेखरच्या स्वाधीन करत विशाखेनं त्याला थोडक्यात लयलेची माहिती पुरवली आणि टिकायची नाही फार दिवस असा अभिप्रायसुद्धा देऊन टाकला... पण शेखरचं म्हणणं पडलं, " तुला घरकाम निभत नाही ना, मग कुठं तरी जमवून घेतलं पाहिजे... मात्र तिच्यावर लक्ष ठेव हं चांगलं..."

सुरवातीलाच विशाखेनं बोलणंचालणं आवरतं ठेवलं होतं. लयलेवर चांगली नजर ठेवली होती. पहिले काही दिवस ठीक गेले. चटचट कामं उरकणारी लयला काम लक्खही करत होती. त्यामुळं विशाखेला फार बरं वाटलं. काम परस्पर होत असल्यानं विशाखेला पूर्वीप्रमाणेच सुप्रियेकडे अधिक लक्ष देता येत होतं... शिवाय लयलानं अधिक उत्साहानं, न ठरलेली काही कामं करायला आपण होऊन सरसावत होती.

कधी तांदूळ वगैरे निवडायला बसलं, म्हणजे लयला आपल्या आयुष्याची कहाणी आपण होऊन सांगत बसायची. लयलेचं आयुष्य अनेक चढउतारांतून गेलेलं असल्यानं विशाखेला त्यातील किस्से ऐकताना कंटाळा येत नसे. आतापर्यंत पुष्कळ सांगितलं होतं लयलेनं... लग्न झालं, तेव्हा लयला फक्त सहा वर्षांची होती. लग्नाच्या वेळच्या फार थोडया गोष्टी तिच्या लक्षात राहिल्या होत्या. लयलेचं माहेर खाऊन–पिऊन बऱ्यापैकी होतं आणि सासर तसं नात्यातलंच होतं. काही विशेषच प्रसंग असला तर लयलेचं सासरी जाणं व्हायचं. दोनचार दिवसांपुरतं...! दिवस चालले होते. लयला माहेरी वाढत होती, मोठ्या लाडात. चौघा भावांची ती एकुलती एक बहीण. सारीच तिचं कौतुक करायची. कुवतीप्रमाणं कोड पुरवायची... लयला मोठी झाली आणि खऱ्या कहाणीला सुरवात झाली. लयलेच्या वडिलांनी सुचवूनसुद्धा तिला न्यायला सासरचा मुराळी येईना. आज कोण येईल, उद्या कोण येईल, म्हणत दिवस आणखी गेले... बरेच दिवस गेले आणि एके दिवशी लयलेचा सासरा येऊन तिला सासरी घेऊन गेला. सासरी आल्यावर लयलेच्या पुढं दैवानं वेगळंच ताट मांडून ठेवलेलं आढळलं. लयलेच्या माहेरी, फार काय स्वतःच्या घरातसुद्धा विशेष पत्ता लागू न देता लयलेच्या नवऱ्यानं दुसऱ्या एका मुलीशी लग्न उरकून टाकलं होतं. दीड एक वर्षापूर्वी नव्या नवरीला संगे घेऊनच एका संध्याकाळी रामजीनं घरात पाऊल टाकलं होतं... या नव्या नवरीच्या येण्यानं घरात एकच गोंधळ उडवून दिला होता. बिचाऱ्या नव्या नवरीलाही अगोदर कल्पना नव्हती, की आपल्याला सवत आहे!... आणि हा सारा प्रकारच लयलेच्या सासरी येण्याच्या उशिराच्या मागे होता...लयला आणि तिची सवत एकमेकींवर वाघिणीसारख्या तुटून पडत. त्या सवतीचं ऐकून रामजी लयलेला मारपीट करी...आता तो सवतीला घेऊन वेगळा राहिला होता...! हे सारं सांगताना लयला एवढ्या शांत सुरात सांगायची, की विशाखेला नवल वाटल्यावाचून राहात नसे. एकदा ती गमतीत येऊन सांगू लागली,

"वयनी, अवो त्या बाईला बगाल तर डोकंच उठल तुनचं...जळकं लाकूड शिवट गोरं असंल, असला हाय रंग तिचा...आनिक नाक म्हनाल तर कुटंच दिसत न्हाई...अक्षी माकाड हाय म्हनीनासा..."

विशाखेनं सहज विचारलं, "मग सासरी आल्यावर हा सगळा नशिबाचा खेळ

पाहून रडली असशील नाही ? "

" आता ग बया ! आनि रडायचं व्हो कशापायी ? ...मस समदी म्हनत्याती, ' लयलू, याला सोडून दे. दुसरी सोयरीक करू...' माजी सासूसुद्दा म्हनती तसं ! "

सारं ऐकून विशाखा चकित होऊन गेली होती. आता काही ऐकूही नये आणि आपण होऊन, काही विचारूही नये, असं तिला वाटायला लागलं. तरीपण तिच्या तोंडून प्रश्न गेलाच. " मग, काय ठरतंय् तुझं ? "

खुदूखुदू हसत लयला म्हणाली, " दुसरं काय हुयाचं वो ? रेटंल तिथंवर रेटायचं, न्हाईतर तो मारग होईच की ! "

विशाखेला मग गरगरायला लागलं. ती म्हणाली, " हे बघ, चटकन् हे तांदूळ भरून ठेव आता...मला बाहेर जायचंय्. "

" आनिक सुपली निजलीया ती ? "

" ती उठेल एवढ्यात...तू आवर. "

" आनि दळन वो ? "

" दळन आता उद्या. "

" गिरण बंद वयनी उद्या. "

" परवासुद्धा चालेल आणलं तर. "

" पाण्याची भांडी ? "

" नाही घासलीस का अजून ? तुला हल्ली काम करायला नको झालंय्. सकाळी सांगितली होती ना घासायला ?...सकाळी काय केलंस मग एवढा वेळ ?..."

विशाखा संतापलेली पाहून लयला उठली. भराभरा पसारा आवरून तिनं पाण्याची भांडीसुद्धा घासून टाकली...विशाखा घुसमुसत आठवू लागली. सकाळी मीनलच्या आईनं तातडीचं बोलावणं पाठवलं, म्हणून आपण सुप्रियेला घेऊन गेलो. शेखर घरात आहेच, तेव्हा काळजी नाही, असा विचार केला. लयला घरातच होती धुणं धूत होती. तिला पाण्याची भांडी घासायला सांगून आपण गेलो...हिनं भांडी तर घासली नाहीत, तर मग केलं काय ? आपण परत आलो, तेव्हा ती गेलेली नव्हती...शिळ्यापाकाच्या आशेनं थांबली होती...

आता लयलेनं जाऊ का म्हणून जेव्हा विचारलं, तेव्हा विशाखेनं पुनः विचारलं, " सकाळी केलंस काय मग ? "

" सक्काळच्याला... त्या फळ्या न्हाई का लावल्या ?... "

" बरं. जा, " विशाखा म्हणाली खरी, पण मग तिचं लक्ष कशात लागेना... सुप्रियेला मीनलकडे खेळत सोडून ती लगेच घरी परतली आणि तिनं सेल्फ तपासलं...फळांच्या करंडीतली दोन केळी बेपत्ता होती. पुड्यातली चांगली सात-आठ बिस्किटं गायब झाली होती...सकाळी भाजून निवायला ठेवलेल्या शेंगदाण्यातले जवळजवळ निम्मे दाणे कुठं दिसतच नव्हते...

शेखर आल्यावर विशाखेनं सारा पाढा त्यापुढं वाचला...शेखर म्हणाला, "संतापून कसं चालेल असं ?...आपलीच चूक नाही का झाली तिच्याकडे लक्ष दिलं नाही ही ?...'

" आपली म्हणजे तुमची स्वतःची म्हणा. "

" तसं म्हण पाहिजे तर...पण मला सांग, तू घरात नसताना आणि ती बया एकटी घरात असताना मी स्वयंपाकघरात घुटमळणं शक्य होतं का ? "

विशाखेचं बोलणंच खुंटलं. ती म्हणाली, " आता इथून पुढं काय ?...आज या साध्या गोष्टींवर तिची नजर, उद्या पैशांसाठी तीच नजर भिरभिरणार नाही कशावरून ? "


" पण दुसरी बाई मिळणार आहे का लगेच ?...तुझं तू काम करायचीस म्हणजे दुखणंच ओढवून घेणार की ! "


" मी पाहते या दोन चार दिवसांत दुसरी बाई...नाही तर त्या रमाबाई आहेतच की. परवा ओझरतं म्हणाल्या होत्या, मी करीन काम–फक्त धुणं–भांडी–चालेल... काहीही चालेल, पण लयला नको ".

" तसं कर, तोपर्यंत पुनः एकदा छोटी ट्रायल घेऊन पाहा..." शेखर म्हणाला.


शेखरचा हा पवित्रा पाहताच मात्र विशाखा दचकली...त्याचक्षणी लयलाला हाकलण्याचे तिने नक्की केले.

● ● ●





नाझी राजवटी
नाझी अंकित देश
तटस्थ राष्ट्रें
दोस्त राष्ट्रें
नाझी व्याप्त प्रदेश
0 ४०० मैल
आइसलंड
संयुक्त राज्ये
लंडन
इंग्लीश खाडी
पॅरीस
फ्रान्स
जर्मनी
स्पेन
माद्रिद
लिस्बन
जिब्राल्टर
अल्जीर्स
ओरान
मोरोक्को
अल्जेरिया
लिबिया
ट्युनिस
मार्सेली
कॉर्सिका
रोम
नेपल्स
स्टॉकहोम
युगोस्लाव्हिया
अथेन्स
क्रीट




# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध :

लेखांक चौथा

### नॉर्वेतील असंख्य पावनखिंडी

डेन्मार्कच्या राजाने-प्रजेने प्रतिकाराविना शरण जावे व नॉर्वेच्या राजाने मात्र प्रतिकाराचा निर्णय घ्यावा, याचे रहस्य काय? जसा मुलूख तशी माणसे हा साधा नियम! 'गुजराथेत हैदोस घालणाऱ्या मोगली सरदारांची थडगी महाराष्ट्रात का–' जसा मुलूख तशी माणसे! नॉर्वेचा बराच मोठा भाग पर्वतमय व त्यातील उंच

भाग सदैव बर्फाच्छादित. किनारा अतिशय दंतुर. पश्चिम किनाऱ्याजवळ लहान लहान बेटे तयार झालेली, त्यांची संख्या दीड लक्षाहून अधिक. किनाऱ्यापासून आत बरेच लांबवर गेलेले समुद्राचे चिंचोळे फाटे. यांनाच फिऑर्डस् म्हणतात. प्रत्येक फिऑर्डचे दोन्ही काठ भिंतीसारखे उभे व शेकडो फूट उंच. खोली अनंत. परंतु एका-वेळी एकच बोट आत येणार ! अशा निसर्गनिर्मित अनंत पाणखिंडी .नॉर्वेच्या किनाऱ्यावर असल्याने–जर्मन आरमाराची व लुप्तवाफ्ची मात्रा लागू पडायची, तर मोठा काळ जाणार. नार्विक बंदर याच कारणामुळे ५८ दिवस लढत राहिले ! म्हणूनच नॉर्वेजियन्सनी शरणागतीऐवजी मरणागती पत्करली. नॉर्वेच्या राजाने जर्मन दूताला ताडकन सांगितले–


" माझे सरकार जे ठरवील, त्याला मी बांधलेला आहे. देशांतर करीन, द्रोह नाही ! "

नॉर्वे सरकारच्या या बाणेदारपणाने नाझी नेते चिडीस गेले. त्यांच्या तावडीतून राजे हकून निसटले, हे शल्य तर त्यांच्या मनात होतेच. तेव्हा आता राजे हकून यांना काहीही करून जिवंत वा मृत स्थितीत ताब्यात घेण्याचा निकराचा अफझुल-खानी प्रयत्न जर्मनांनी सुरू केला. ११ एप्रिलला राजे हकून यांनी, ब्राऊर यांची भेट घेण्यासही नकार देताच त्याच दिवशी म्हणजे ११ एप्रिलला रात्री, राजे ज्या खेड्यात राहात होते, त्या निबरसूद (Nybergsund) या खेड्यावर लुप्तवाफने मोठ्या प्रमाणावर बॉम्बफेक करून ते खेडे बेचिराख केले. या हत्याकांडात राजे हकून ठार झाले असावेत, या भ्रमात जर्मन नेते होते. परंतु प्रत्यक्षात जर्मन बॉंबर्सनी बॉम्बफेक सुरू करताच राजे हकून, कंबरेपर्यंत बर्फात उभे राहून जवळच्या रानातून खेड्याची जाळपोळ शांत चित्ताने पाहात होते.

सकाळीं बॉम्बफेक थांबली. खेडे जळत होते. राजे हकून यांच्यापुढे दोन पर्याय होते. पहिला उत्तरेकडे जाऊन स्वीडनमध्ये राजकीय आश्रय घेणे व दुसरा म्हणजे नॉर्वेतच राहून प्रतिकाराला स्फूर्ती देत राहणे. राजांनी दुसरा पर्याय पत्करला. राजे पळून गेलेच तर उत्तरेकडे जातील, असा जर्मनांचा तर्क होता. प्रत्यक्षात राजानें दक्षिणेचा रस्ता पत्करला व आपल्या सरकारसह ते अंदालसनेस् या बंदराकडे निघाले. हे बंदर ट्रॉंडीम बंदराच्या दक्षिणेकडे होते.

नार्विकचा कबजा जर्मनांनी १० एप्रिललाच केला होता व ट्रॉंड्रीम येथेही जर्मन सैन्य उतरले होते. नॉर्वेजियन सैनिकांनी आपला प्रतिकार अंदालसनेस् व नामसे बंदरामधून चालू ठेवलेला होता. ही दोन्ही बंदरे ट्रॉंड्रीमच्या दक्षिणेस व उत्तरेस अनुक्रमे होती.

नार्विक बंदराचा कबजा जर्मनांनी उत्तरेस केला व दक्षिणेस स्टॅव्हेजर व बर्गेन ही बंदरेही त्यांच्या हाती पडली होती. अशा परिस्थितीतही ब्रिटिशांच्या 'वॉरस्माईट' या लढाऊ बोटीने १३ एप्रिलला काही विनाशिकांच्या मदतीने




नार्विकवर प्रतिहल्ला चढवला व बंदर ब्रिटिशांच्या हाती पडून, तेथे कबजा करून बसलेला जर्मन सेनानी डीएटल (Dietl) याने नार्विक सोडून आतील भागात माघार घेतली. ब्रिटिशांना या वेळी अधिक कुमक हवी होती व मेजर जनरल मॅकसे हा पाठोपाठ सैन्याची जहाजे घेऊन नार्विकजवळ पोचलेला होता. परंतु नार्विक जर्मनांच्या कबजातच अजून आहे, या कल्पनेने त्याने आपले सैन्य नार्विकच्या उत्तरेस ३५ मैलांवर उतरवले ! ही मोठीच चूक झाली व अखेर नार्विकची लढाई ब्रिटिशांनी गमावली.

नॉर्वेजियन सैन्याने ट्रॉन्ड्रीम लढवले नाही, परंतु अंदालसनेस् व नामसे ही बंदरे

त्यांच्या ताब्यात आहेत, याचा फायदा घेऊन २० एप्रिलला ब्रिटिश सैन्य नामसे व अंदालसनेस् या दोन्ही ठिकाणी उतरले. उत्तर दक्षिणेकडून ट्रॉंड्रीमवर हल्ला करावयाचा असा दोस्तांचा विचार होता.

**ब्रिटिशांची पळापळ**

२१ एप्रिलला लिलेहॅमर या ठिकाणी जर्मन व ब्रिटिश सैनिकांची प्रथमच समोरासमोर गाठ पडली. ब्रिटिशांजवळ होत्या फक्त रायफल्स व मशिनगन्स. इतर सर्व रणसाहित्य आणणारे ब्रिटिश जहाज जर्मन विमानाने बुडवलेले होते. याउलट जर्मनीने रणगाडे, चिलखती गाड्या नॉर्वेत उतरवल्या होत्या व विमानतळाचा कबजा पहिल्याच धडाक्याला करून जर्मन विमाने आकाशातून सतत अग्निवर्षाव करीत होती. लिलेहॅमर येथून ब्रिटिशांची पळापळ सुरू झाली. १४० मैल मागे हटत हटत हे सैन्य अर्धमेल्या अवस्थेत ३० एप्रिलला अंदालसनेस् या बंदरात पोचले. मध्येच थोडी लढाई करावी व पुन्हा बरेच मागे पळत सुटावे अशी ही लढाई होती! जर्मनीने ब्रिटिशांना कोंडीत पकडले होते. २९ एप्रिलला राजे हकून व त्यांचे सरकार यांना घेऊन "ग्लासगो" ही ब्रिटिश क्रूझर झपाट्याने इंग्लंडकडे रवाना झाली. आकाशात बॉम्बफेक सुरू असतानाच ब्रिटिश सैन्याने अंदालसेनस् बंदरातून माघार घेतली. २ मे ला नामसे बंदरातूनही ब्रिटिशांना जर्मनीने पळवले. सर्व दक्षिण नॉर्वे व जवळजवळ सर्व बंदरे ही जर्मनांच्या हाती आता पडलेली होती. ऑस्लो राजधानीवर जर्मनांचा कबजा होता. राजे हकून पळून गेले होते. नॉर्वेची लढाई हिटलरने जिंकून ब्रिटिशांना स्तिमित केले होते. फक्त एकच शहर अजून झुंजत होते—नार्विक !

सर्व नॉर्वे मिळाला व नार्विक मिळाले नाही तर काय उपयोग ? स्वीडनचे खनिज लोखंड याच बंदरातून बाहेर पडणार होते. जर्मनांचा इलाज चालत नव्हता. २५००० हून अधिक ब्रिटिश सैन्याची कुमक येताच, नार्विकमधून जर्मनांना हुसकवण्यात आले होते व जनरल डीएटल आपले सैन्य घेऊन उत्तरेकडच्या डोंगराळ भागात दडून बसला. नार्विकवर बाँबफेक प्रचंड प्रमाणावर झाली, परंतु ब्रिटिशांच्या आरमाराने नार्विकचा पक्का कबजा केलेला होता, यात संशय नाही. उरलेसुरले नॉर्वेजियन सैन्य व ब्रिटिश सैन्य नार्विक युद्धवीत होते.

**नॉर्विकवर स्वस्तिक निशाण**

परंतु १० मे ला दोस्तांचा सगळाच हिशेब उलटासुलटा करून, जर्मन सैन्याने बेल्जम—हॉलंडमधून फ्रान्सच्या दिशेने गरुडझेप घेतली ! नार्विकमध्ये अडकलेले सर्व ब्रिटिश आरमार व प्रत्येक ब्रिटिश सैनिक यांची फ्रान्सच्या रणभूमीवर आता अधिक आवश्यकता होती. नार्विक लढत राहिले व फ्रान्स कोसळले, तर अर्धी लढाई संपल्यासारखे होणार होते. शर्थीने कबजा केलेले हे बंदर ब्रिटिशांनी २८ मे ला सोडले व जर्मन सेनानी जनरल डीएटल याने डोंगराळ भागातून पुढे येऊन ८ जूनला नॉर्विकवर स्वस्तिक निशाण फडकवले !

नंतर विचार करता, ब्रिटिशांच्या हे ध्यानात आले, की नार्विकमध्ये ब्रिटिश सैन्य अडकून पडावे, म्हणून तर जर्मनीने ही हुलकावणी दिली नसेल ना ? कारण नॉर्वेचा दक्षिण भाग व डेन्मार्क हाती पडताच जर्मनीने पश्चिम आघाडीवर रणकुंड पेटवले. एकदा हे रणकुंड धडाडले, की ब्रिटिशांना नार्विक सोडण्यावाचून गत्यंतर नाही, असा साधा हिशेब तर अॅडमिरल रीडरने मांडला नसेल ? कसेही असो, नॉर्वेच्या लढाईत जर्मनांनी ब्रिटिशांना अखेर पळता भुई थोडी केली, यात संशय नाही. नॉर्वेच्या लढाईत सर्वप्रथम जर्मन जनरल डीएटल याने नार्विकचा कबजा केला व थोडया सैन्यानिशी ब्रिटिशांना झुंझवत ठेवले. या कर्तबगारीबद्दल त्याला हिटलरने मेजर जनरलची जागा दिली व त्याचा बहुमान केला.

१५ एप्रिलला क्विसलींग हा नॉर्वेचा पंतप्रधान झाला, तरी महिनाभरात नॉर्वेजियन लोकांचा राग लक्षात घेऊन जर्मनांनी क्विसलींगला डच्चू दिला व सहा नॉर्वेजियन नागरिकांचे सरकार स्थापन केले. दोन वर्षांनी क्विसलींगविरोधी वावटळ शमली आहे, या अंदाजाने १९४२ मध्ये जर्मनांनी पुन: क्विसलींगला नॉर्वेचा पंतप्रधान केले.

[ १९४५ मध्ये जर्मनीचा पराभव झाल्यावर, क्विसलींगवर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्याला फासावर लटकावण्यात आले. नॉर्वे देश जर्मन वर्चस्वाखालीं असताना क्विसलींगच्या मागे राहून ज्याने नॉर्वेवर राज्य केले, त्या जोसेफ टर्बोव्हेन या नॉर्वमधील राइश कमिशनरने जर्मनीच्या पराभवानंतर आत्महत्या केली. सुप्रसिद्ध नॉर्वेजियन कादंबरीकार हमसन याने नाझी राजवटीत त्या राजवटीशी हातमिळवणी केली होती. त्याचे वय व लेखनकर्तृत्व लक्षात घेऊन, त्याला जर्मनीच्या पराभवानंतर प्रचंड दंड ठोठावण्यात आला. मुकेकंगाल अवस्थेत हा नोबेल पारितोषिक विजेता लेखक १९ फेब्रुवारी १९५२ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी मृत्यू पावला. ]

## जर्मनीचा दरारा वाढला

नॉर्वेमधील जर्मनांचा विजय हा यथार्थाने त्यांचा दिग्विजय होता. इंग्लंडची नाउमेदी या मोठ्या पराभवाने शतगुणित झाली होती. हिवाळ्यात खनिज लोखंडाचा मार्ग या विजयाने निर्वेध झालाच, शिवाय नॉर्वेच्या बंदरांतून जर्मन आरमाराला उत्तर अटलांटिकमध्ये शिरण्यास फटी मोकळ्या झाल्या. नॉर्वेचे विमानतळ हिटलरचे हाती आल्याने ब्रिटिशांविरुद्धच्या युद्धात या तळांचा वापर महत्त्वाचा ठरणार होता.

मुख्य म्हणजे या विजयाने जर्मन राईशचा लष्करी दरारा, युरोपात कल्पनेबाहेर वाढला व तेवढ्या प्रमाणात दोस्तांची नाचक्की झाली.

पण या युद्धाने जो महत्त्वाचा लष्करी निष्कर्ष निघाला, त्यामुळे ब्रिटिशांचे धाबे दणाणले. हा निष्कर्ष म्हणजे आकाशात वर्चस्व मिळवून बॉम्बर्स व फायटर्स यांच्या सहाय्याने नाविक दलाचा विध्वंस करून लढाई जिंकता येते, ही गोष्ट आता

[ पृष्ठ ४२ वर चालू ]

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
आणि
किफायतशीर गुंतवणूक



राजा शिवछत्रपती

हे ब. मो. पुरंदरे यांचे अपूर्व सुंदर शिवचरित्र प्रत्येक मराठी कुटुंबात असावे यासाठी 'राजहंस प्रकाशन संस्था' सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत आहे.

अनेक थोरामोठ्यांनी व सर्वसामान्य व्यक्तींनीही या चरित्र-प्रसाराच्या कार्याला आजवर मनःपूर्वक हातभार लावलेला आहे.



## दि. ३ मे १९६५

या दिवशी

या शिवचरित्राची तिसरी सचित्र आवृत्ती

प्रसिद्ध झाली.

- **मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)**
- **उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी**
- **दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठ सजावट**
- **ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे**

□ किंमत ३६ रुपये

१०० रुपयांची ठेव

५ वर्षांसाठी

'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.

राजहंस प्रकाशन संस्थेकडे आपली शंभर रुपयांची ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.

□ ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

□ चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन**

**४१९ नारायण, पुणे.**

निरपवादपणे सिद्ध झाली होती. जमिनीवरील युद्धातही जनरल डिएटल या जर्मन सेनानीचे डावपेच हे ब्रिटिशांना मंत्रमुग्ध करणारे ठरले होते. थोडक्यात, सैनिकी युद्धात व आकाशात जर्मनी, इंग्लंडला वरचढ आहे, याची निश्चित कल्पना ब्रिटिशांना आता आली होती......व इंग्लंडचे आरमार हे अभेद्य आहे, या कल्पनेला मोठा तडा गेला होता.

नॉर्वे–डेन्मार्क या दोन्ही देशांचा कबजा करताना जर्मनीची मनुष्यहानी किती झाली पाहा—१३१७ सैनिक मारले गेले, २३७५ बेपत्ता व सुमारे १६०० जखमी झाले. याउलट जवळजवळ एवढीच किंमत देऊन ब्रिटिश व नॉर्वेजियन सैन्याने लढाई मात्र गमावली होती. शहरे बेचिराख झाली होती. बंदरे उद्ध्वस्त झाली होती. निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले होते, ते निराळेच.

ब्रिटिशांनी एक मोठे विमानवाहू जहाज, एक क्रूझर, सात विनाशिका या युद्धात गमावल्या. जर्मनीची हानी किती झाली, याचा निश्चित अंदाज त्या वेळी आलेला नसला, तरी आता त्याची आकडेवारी उपलब्ध आहे. जर्मनीच्या एकंदर २० विनाशिकांपैकी १० विनाशिका या युद्धात त्यांनी गमावल्या ! ८ क्रूझर्सपैकी ३ क्रूझर्सना जलसमाधी मिळाली व ३ जर्मन युद्धनौका निकामी झाल्या, यावरून हे लक्षात येते, की ब्रिटिशांच्या एकंदर आरमारी शक्तीच्या प्रमाणात, त्यांची हानी विशेष नसली तरी जर्मनीच्या आरमाराचा मोहोर मात्र गळून गेला होता...म्हणूनच इंग्लंडने नॉर्वेची लढाई गमावली, तरी अखेर इंग्लंडने युद्ध जिंकले ! !

लाक्षणिक अर्थाने बोलावयाचे, तर नॉर्वेच्या या लढाईत इंग्लंडचा झालेला पराभव हीच त्यांच्या या महायुद्धातील अंतिम जयाची नांदी ठरली. नॉर्वेच्या युद्धात जर्मन नाविकदलाचा मोहोर गळून पडला व इंग्लंडवरील स्वारीचे हिटलरचे मनसुबे वांझोटे ठरले व याच युद्धातील पराभवाने चेंबर्लेनचे सरकार गडगडून ब्रिटिश प्रतिकाराचा व धैर्याचा पुढे मोहरा ठरलेला इंग्लिश मोहरा विन्स्टन चर्चिल हा इंग्लंडचा पंतप्रधान झाला.

## चेंबर्लेन यांचा मनोभंग

७ मे, १९४० ला ब्रिटिश सभागृहात लढाईच्या परिस्थितीवर चर्चा सुरू झाली. चेंबर्लेन यांनी सुरवातीला भाषण करण्याकरता तोंड उघडताच सभागृहातून चोहोबाजूंनी त्यांचा उघड उपहास सुरू झाला. ४ एप्रिलला—'हिटलरची बस चुकली', असा हर्ष झालेला पराभूत पंतप्रधान, आता नॉर्वेत ब्रिटिशांची बस हिटलरने कशी चुकवली, याची करुण कहाणी जेव्हा सांगू लागला, तेव्हा सभागृहाने त्याचा उपहास सुरू केला.

चेंबर्लेन यांचे भाषण संपताच एकापाठोपाठ एक विरोधी पक्षाचे व आश्चर्य म्हणजे सरकार पक्षाचेही सभासद चेंबर्लेन सरकारवर कठोर प्रहार करू लागले. सरकारी बाकांवरून अॅमेरी हे कॉन्झर्वेटिव्ह सभासद उभे राहिले व त्यांनी क्रॉम्वेलच्या

शब्दांत चेंबर्लेन यांना सुनावले—

" You have sat too long for any good you have been doing. Depart I say & let us have done with you ! In the name of God– go ! "

[ महाशय, जे काही फारच थोडे चांगले आपण केलेत, त्या मानाने फारच काळ आपण इथे ठाण मांडून बसला आहात. चालते व्हा...! मी म्हणतो आता तरी तोंड काळे करा. देवाचे नाव घ्या आणि कृपा करून आता उठा ! ! ]

क्रॉम्वेलने पार्लमेंट बरखास्त करताना सभासदांना सुनावलेले हे भयंकर शब्द, इतक्या वर्षांनंतर अॅमेरी यांनी चेंबर्लेन यांना उद्देशून वापरताच सभागृहात अनुमति-दर्शक टाळ्यांचा कडकडाट दुमदुमला.

सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला गेला होता. चर्चेचा समारोप करताना विन्स्टन चर्चिल यांनी, नॉर्वेच्या पराभवाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतली व चेंबर्लेन यांचेवर हा अन्याय आहे, असे सभासदांना विनवून सांगितले. अर्थात चेंबर्लेन सरकारात मंत्री असल्यामुळे या वेळी चर्चिल योग्य तेच करीत असले, तरी त्यांनाही चेंबर्लेन यांना वाचवणे आता शक्य नाही, ही गोष्ट स्पष्ट दिसत होती. ८१ मतांनी अविश्वासाचा ठराव बारगळला, तरी ३० सरकार पक्षाच्या सभासदांनी ठरावाच्या बाजूने मते दिली व ६० सरकारी सभासद तटस्थ राहिले, याची दखल चेंबर्लेन यांना घ्यावी लागली.

८ व ९ मे हे दिवस चेंबर्लेन यांनी विचारात घालवले. १० मे, १९४० उजाडला; तो जर्मन सैन्य हॉलंड, बेल्जममध्ये घुसल्याची वार्ता घेऊन. अनेक ठिकाणी जर्मन सैन्य सरहद्द ओलांडून फ्रान्सच्या दिशेने निघाल्याच्या वार्ता पहाटेपासून थडकू लागल्या. आता विचारालाही वेळ नव्हता. चेंबर्लेन यांनी निर्णय घेतला—" आपल्याला अधिकारावरून गेले पाहिजे ! पंतप्रधान म्हणून आपण आता नेतृत्व करू शकत नाही. "

सर्वपक्षीय राष्ट्रीय सरकार स्थापन करावयाचे, हा निर्णय कॉन्झर्वेटिव्ह पक्षाने घेतला होताच. आता अशा सरकारचे नेतृत्व करण्यास आपण असमर्थ असल्याची कबुली चेंबर्लेन यांनी देताच, पुढचा मार्ग मोकळा झाला. चेंबर्लेन यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा इंग्लंडच्या राजांच्या हाती ठेवला.

### १० मे : चर्चिल अवाक झाले

यापुढे १० मे रोजी काय घडले याचा वृत्तांत चर्चिलच्या शब्दांतच देणे योग्य—

" सकाळी ११ वाजता पंतप्रधानांच्या निवासस्थानी–१० डाउनिंग स्ट्रीट येथे मला बोलावणे आले. मी पोचलो तेव्हा तिथे लॉर्ड हॉलिफॅक्सही होते, आम्ही दोघे चेंबर्लेन यांच्यासमोर खुर्च्यांवर बसलो. चेंबर्लेन यांनी खुलासा केला, की राष्ट्रीय सरकारचे नेतृत्व करणे त्यांना शक्य होणार नाही–"

"माझ्या आतापर्यंतच्या सार्वजनिक जीवनात मी पुष्कळ भेटी-गाठी घेतलेल्या होत्या, परंतु प्रस्तुतची भेट ही सर्वांत महत्त्वाची होती. नेहमी मी फार बोलणारा, परंतु यावेळी मात्र मी अवाक झालेलो होतो..."

"मी बोलत नव्हतो व काही क्षण असेच गेले. विशेष प्रसंगी आपण दोन मिनिटे स्तब्धता पाळतो, त्यापेक्षा हा निःशब्द काळ मला मोठा वाटला. शेवटी हॉलिफॅक्स म्हणाले, 'कॉमन्स सभागृहाबाहेरील लॉर्ड ते असल्याने, पंतप्रधानांची जबाबदारी अशा तऱ्हेच्या युद्धात सांभाळणे मला फारच कठीण जाईल.' अशाच सुरात हॉलिफॅक्स काही काळ बोलत होते. त्यांचे बोलणे संपेतोपर्यंत ही गोष्ट स्पष्ट झाली, की मलाच हे कर्तव्य पार पाडावे लागणार आहे. मग मी सांगितले, " की मला राजेसाहेबांकडून सरकार बनविण्याची अनुमती मिळाल्याखेरीज, मी विरोधी पक्षांशी कसलीही बोलणी करणार नाही. मी यानंतर अॅडमिरॅलिटी निवासात परतलो...तो तेथे अपेक्षेप्रमाणे बऱ्याच गोष्टी माझ्यासाठी खोळंबलेल्या होत्या..."

"हॉलंडचे मंत्री माझ्या खोलीत होते. त्यांचा अवतार झालेला होता. विमनस्कस्थितीत ते होते. त्यांच्या डोळ्यांत भयानक भीति मूर्तिमंत उभी होती. त्यांच्या देशावर कसलीही पूर्वसूचना न देता आक्रमण झाले होते. जाळपोळीचा पर्वत त्यांच्या सरहद्दीवरून आत गडगडत आला होता. चिलखती सैन्याने त्यांच्या सरहद्दीवरून आत झेप घेतली होती. देशात सर्वत्र गोंधळ माजला होता—"

**दोस्तांच्या फळीत भगदाड**

मागील युद्धाप्रमाणे बेल्जममधून हॉलंडमध्ये उतरून मग सैन्याचे दोन जबडे तयार करण्याचे तंत्र या वेळी जर्मनीने वापरले नव्हते. उलट मॅजिनॉट तटबंदीचे उत्तरेकडचे ठाणे 'सेडान' शहर याला बगल देऊन, जर्मनीने फ्रान्समध्येही जोराची मुसंडी मारली होती. बेल्जम–हॉलंडमध्ये घुसणाऱ्या जर्मन सैन्याला अडविण्यासाठी दोस्त सैन्ये वर सरकली, की सेडानमधून घुसलेल्या मुख्य सैन्याने त्यांना कॅले व डंकर्कच्या दिशेने वर रेटीत न्यावयाचे असा जर्मनीचा इरादा होता. म्हणजे फ्रेंच सैन्याचा महत्त्वाचा भाग दक्षिणेकडे व सर्व ब्रिटिश सैन्ये व फ्रेंचांच्या उत्तम तुकड्या उत्तरेकडे, असे दोस्तांच्या फळीत मोठेच भगदाड जर्मनीने पहिल्याच दिवशी पाडले होते. चर्चिल सांगतात–" जर्मनी असा काही लष्करी पेच निर्माण करू शकेल, याची कल्पनाही ब्रिटिशांना व फ्रेंचांना नव्हती."

[The decisive stroke of the enemy was not of a turning movement on flank, but a break through the main front. This none of us, or French, who were in responsible forsaw.]

सायंकाळचे पाच वाजले. विन्स्टन चर्चिल यांना बकिंगहॅम राजवाड्यातून अपेक्षेप्रमाणे निमंत्रण आले. सहाच्या ठोक्याला चर्चिल राजवाड्यात पोचले. चर्चिल सांगतात –

" मला लगेच राजेसाहेबांपुढे नेण्यात आले. राजेसाहेबांनी माझे प्रेमाने स्वागत करून बसण्याची विनंती केली. माझ्याकडे काही क्षण शोधक नजरेने पाहात त्यांनी म्हटले; " मी तुम्हाला का बोलावले याची बहुधा तुम्हाला कल्पना नसेल ना ? " राजेसाहेबांच्याच सुरात सूर मिसळवून मी म्हटले, " महाराज, ... खरोखरच मला याची काहीच कल्पना करता येत नाही ! " राजेसाहेब हसले आणि म्हणाले, " तुम्ही सरकार बनवावे, असे माझे तुम्हाला सांगणे आहे. " होकार देऊन मी सांगितले,–" लेबर व लिबरल पक्षाच्या नेत्यांशी बोलून मी पाच किंवा सहा मंत्र्यांचे युद्ध मंत्रिमंडळ बनवू इच्छितो. यांतील निदान पाच नावे मी आज मध्यरात्रीपर्यंत तुमच्या हाती देईन–" यानंतर मी त्यांची रजा घेतली व माझ्या आरमारी कचेरीत परतलो. "

मध्यरात्रीपूर्वी चर्चिल यांनी युद्ध मंडळाच्या समासदांची (War Cabinet) नावे, लेबर नेते ॲटली यांच्याशी व लिबरल नेते सिंक्लेर यांच्याशी बोलणी करून राजेसाहेबांना कळवली. चेंबर्लेन यांनी कॉमन्स सभागृहाचे नेतेपद व कौन्सिलचे अध्यक्षपद स्वीकारून, चर्चिल यांचे एक मंत्री म्हणून मंत्रिमंडळात काम करण्याची चर्चिल यांची विनंती मान्य केली. चेंबर्लेन यांचा हा खरोखरीच मनाचा मोठेपणा होय. देशाचे भीषण नुकसान आपण करीत आहोत, नेतृत्व आपल्याला पेलत नाही, याची जाणीव होताच सभागृहात ८१ मतांनी अविश्वासाचा ठराव फेटाळला गेला असताही त्यांनी पंतप्रधानपद सोडले व चर्चिल यांचे सरकार स्थिर होण्यासाठी सामान्य मंत्री म्हणून आपली सेवाही त्यांनी मान-अपमानाचा विचार न करता चर्चिल यांना देऊ केली. या अशा केवळ देशाचा विचार करून स्वीकारलेल्या तडजोडीचे महत्त्व किती असते व असा शहाणपणा ज्यांना वेळीच सुचत नाही, ते देशाचा केवढाला घात करतात याची कल्पना निदान भारतात तरी आता सर्वांना आलेली आहेच.

चर्चिल यांच्या मंत्रिमंडळ-अंतर्गत युद्धमंडळाचे सभासद होते –

लॉर्ड हॅलिफॅक्स, अँथनी इडन, अलेक्झांडर, आर्किबाल्ड सिंक्लेर व विन्स्टन चर्चिल.

## मुक्तीचा आनंद !

१० मे १९४० ला पंतप्रधानपद स्वीकारून, पहाटे तीनच्या सुमारास जेव्हा विन्स्टन यांनी अंथरुणावर अंग टाकले, तेव्हा त्यांची मनस्थिती त्यांनी स्वतःच वर्णन केलेली आहे–

[ पहाटे तीनच्या सुमारास जेव्हा मी अंथरुणावर अंग टाकले, तेव्हा मुक्त मनस्थितीचा आनंद मी अनुभवीत होतो व ही वस्तुस्थिती या माझ्या सत्यनिष्ठ, निवेदनाच्या वाचकांपासून मी लपवू शकत नाही. अखेर एकदाचे सर्व वर्तमान-दृश्यपरिस्थितीसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार माझे हाती आले होते. मला असे वाटत



होते, की यापुढे नियतीच माझे बोट धरून चालत राहणार आहे आणि माझे सर्व पूर्वायुष्य हे, या प्रसंगाला माझी तयारी असावी व मी या कसोटीला उतरावे, या दृष्टीनेच व्यतीत झालेले होते. दहा वर्षे राजकीय वनवासात काढल्यामुळे सर्वसामान्य पक्षापक्षांमधील कुरबुरीपासून मी अनायासेच मुक्त झालेलो होतो. गेली सहा वर्षे मी धोक्याचे असंख्य इशारे दिलेले होते. हे इशारे मोघम नव्हते, तर चांगले सुस्पष्ट केलेले होते. मी इशारा दिलेल्या घटना त्यावरहुकूम आता घडलेल्या होत्या. आता युद्धखोरीचा किंवा युद्धाच्या तयारीचा जनक म्हणून, माझ्यावर कुणाला आरोप करता येण्यासारखा नव्हता. माझी अशी भावना होती, की या प्राप्त परिस्थितीची साद्यंत कल्पना मला आलेली आहे आणि म्हणूनच माझा असा

Walking with Destiny



विश्वासही होता, की अंगीकारलेल्या जबाबदारीत मी अपेशी ठरणार नाही. म्हणूनच जरी सकाळी काय ऐकावं लागते, यासाठी मी उत्सुक होतो, तरी मला शांत झोप लागली. सुखदायक स्वप्नांचीही मला उत्साहबुद्धीसाठी गरज वाटत नव्हती. नाही-तरी स्वप्नापेक्षा प्रत्यक्ष स्थितीच मला अधिक महत्त्वाची वाटते. ]

१० मे १९४० ची रात्र अशी उलटली—नियतीच आपले बोट धरून चालत आहे, या नम्र भावनेने चर्चिल यांनी नेतृत्व पत्करले होते व नियती—म्हणज मी घडवीन ते या आत्मविश्वासाने हिटलरची चिलखती सैन्ये फ्रान्समध्ये दौडू लागली होती. ●

( अपूर्ण )

# मांजरेकर यांना मानपत्र

दि. श्री. कराडकर

होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे धुळवडीच्या दिवशी सकाळी वर्तमानपत्र उघडले आणि मांजरेकर निवृत्त झाला हे कळले.

काय योग आहे पाहा! ज्या मांजरेकरने सन्मानाने निवृत्त व्हायचं, त्या मांजरेकरला ओरडून सांगावे लागले की बघा, शौकीन हो, मी यांना नकोसा झालो आहे! सुभाष गुप्ते 'गुपचुप' निवृत्त झाला! १९६२ च्या वेस्टइंडीजच्या दौऱ्यानंतर पॉली उम्रीगर मानान निवृत्त झाला. परंतु मांजरेकर कष्टाने निवृत्त झाला.

## आकडेवारी

मांजरेकरच्या ह्या निवृत्तीसमयी त्याची क्रिकेट कारकीर्द पाहू. विजय लक्ष्मण मांजरेकर हा 'किंग जॉर्ज'चा विद्यार्थी. शाळेत असतानाच क्रिकेटमध्ये चांगला चमकला व शाळेचा 'किंग' म्हणून त्याचा गौरव होऊ लागला. हा गौरव फुकट गेला नाही, कारण १९५१-५२ मध्ये ऐन विशीत त्याचा कसोटी सामन्यांत प्रवेश झाला. आज फलंदाज म्हणून मान्यता पावलेल्या विजयने क्रिकेटमध्ये प्रवेश केला तो 'आधी यष्टिरक्षक, नंतर फलंदाज' म्हणून. प्रसंग पडला तेव्हा आपल्या यष्टिरक्षणाची किमया मांजरेकरने कसोटी सामन्यांतूनही वेळोवेळी दाखविली आहे. १९५१-५२ साली इकडे आलेल्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध कसोटी सामन्यांत प्रथमच खेळण्याची संधी मांजरेकरला मिळाली. त्यावेळी फक्त दोन कसोटी समान्यांत तो खेळला व तीन डावांत मिळून अवघ्या ७३ धावा ( सरासरी २४·६६ ) त्याने केल्या. १९५२ साली इंग्लंडला गेलेल्या भारतीय संघात मांजरेकरला प्रवेश मिळाला. ह्या दौऱ्यात त्याच्या लौकिकात भर पडेल असे यश त्याला मिळाले. ४ कसोटी सामन्यांतून तो खेळला व त्यात त्याने एकूण १६२ धावा काढल्या ( सरासरी २३·१४ ). पहिल्याच कसोटी सामन्यात लिड्स येथे त्याने १३३ धावा फडकाविल्या, पण पुढल्या सामन्यांतून हा जोश कायम राहिला नाही. १९५२-५३ च्या हंगामात पाकिस्तानचा संघ भारतात आला, त्यावेळी मांजरेकरने ३ कसोटी सामन्यांत ४ डावांत खेळून ५८ धावा केल्या ( सरासरी १४·५० ). पुढे १९५३ साली मांजरेकर भारतीय संघाबरोबर वेस्टइंडीजमध्ये गेला. त्यावेळी

तो ४ कसोटी सामने खेळला व एकूण ८ डावांत त्याने २५४ धावा फडकाविल्या ( सरासरी ३६·२८ ). १९५४–५५ साली पाकिस्तानच्या दौऱ्यात मांजरेकरने ५ कसोटी सामन्यांत ८ डावांत २७० धावा केल्या ( सरासरी ४५.०० ). १९५५–५६ साली भारतात आलेल्या न्यूझीलंड संघाविरुद्ध मांजरेकर छान खेळला. त्याचप्रमाणे १९५६ साली आलेल्या ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध त्याने थोडी चमक दाखविली पण विशेष नाव घेण्यासारखी कामगिरी मात्र केली नाही. १९५८–५९ साली आलेल्या वेस्टइंडीज संघाविरुद्ध खेळताना मांजरेकर घसरला. ४ कसोटी सामने तो खेळला व ८ डावांत मिळून अवघ्या १४८ धावा त्याने केल्या. ( सरासरी २४·६६ ). १९५९ साली मांजरेकर इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला, पण दोन कसोटी सामने खेळल्यावर 'फॉर्म' बरोबर गुडघाही गमावून बसला! १९६१–६२ च्या हंगामात भारतात आलेल्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध खेळताना मांजरेकरला त्याचा 'फॉर्म' सापडला. त्यावेळी तो पाचही कसोटी सामन्यांतून खेळला व ७ डावांत मिळून त्याने ५८६ धावा केल्या ( सरासरी ८३·७१ ). परंतु त्याचे हे कर्तृत्व



क्रिकेट शौकिनांचा
लाडका 'जाड्या'
अखेर 'कष्टाने'
निवृत्त झाला.

१५ मे १९६५

१९६२ च्या वेस्टइंडीजच्या दौऱ्यात लुप्त पावले. तेथे ५ कसोटी सामन्यांत खेळून एकूण १० डावांत अवघ्या १६७ धावा त्याने केल्या ( सरासरी १६·७० ). सांप्रत न्यूझीलंड संघाविरुद्ध मद्रास येथे पहिला कसोटी सामना खेळताना मांजरेकरने दुसऱ्या डावात नाबाद १०२ धावा काढल्या आणि आता तो निवृत्त झालाय्. म्हणजे निवृत्त होताना शतकाचा मुकुट घालून तो निवृत्त झाला, हे मांजरेकरला कौतुकास्पद आहे.

आतापर्यंत मांजरेकर एकूण ५५ कसोटी सामने खेळला व एकूण ९२ डावांत मिळून त्याने ३,२०९ धावा केल्या. त्यापैकी १० डावांत तो नाबाद राहिला. त्याची सरासरी ३९·१३ इतकी होते. १९६१–६२ साली एम्. सी. सी. संघाविरुद्ध खेळताना त्याने १८९ ( नाबाद ) धावा काढल्या. हा त्याचा कसोटी सामन्यांतील वैयक्तिक उच्चांक होय, कसोटी सामन्यांत एकूण त्याने ७ शतके फडकाविली तर १५ अर्ध-शतके मारली. इंग्लंडविरुद्ध तो १७ कसोटी सामने खेळला (३ शतके); पाकिस्तानविरुद्ध १३ ( एकही शतक नाही ); वेस्टइंडीजविरुद्ध १३ ( एक शतक ); ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६ ( एकही शतक नाही ); न्यूझीलंडविरुद्ध ६ ( तीन शतके ). कसोटी सामन्यात ३,००० च्या वर धावसंख्या पुरी करणारा मांजरेकर हा दुसरा भारतीय फलंदाज. पहिला नंबर उम्रीगरचा आहे ( ३,६३२ धावा ).

भारतीय क्रिकेट संघामध्ये मांजरेकर ज्याअर्थी १५ वर्षे 'ठाण' देऊन होता, त्याअर्थी त्याच्यामध्ये काही गुण अवश्य असले पाहिजेत आणि त्याच्यावर टीका करण्यापूर्वी त्याचा 'गुणगौरव' आधी करणे हे शिष्टाचाराला धरून होईल.

## मजबूत मनगट : दांडगा आत्मविश्वास

मांजरेकरचा खेळ शास्त्रशुद्ध असल्याने त्याला त्याच्या ऐन उमेदीत भरघोस लोकप्रियता मिळाली. फलंदाजीतील शास्त्रसंपन्नता व तंत्रनिपुणता त्याने खूप वर्षे कसोशीने टिकवून धरली. त्याचे फलंदाजीतील 'टेक्निक' अत्यंत निर्दोष असे. ऐन उमेदीत त्याचे फुटवर्क उत्कृष्ट असे. अलीकडे ते थोडे कमी झाले होते. तो अलीकडे तिसऱ्या क्रमांकाला फलंदाजीसाठी येत असल्याने काही काही वेळा त्याला आघाडीचा फलंदाज म्हणून कामगिरी करावी लागली आहे. कारण भारतीय संघाच्या आघाडीच्या जोडीपैकी कोणीतरी एक पटकन बाद होत असे आणि मग चेंडूवरील तकाकी घालविण्याचे काम मांजरेकरला करावे लागे. जबरदस्त निष्ठेने तो ही कामगिरी उत्कृष्टपणे पार पाडीत असे. ह्याला मुख्य कारण मांजरेकरच्या मनगटांत असलेला मूळचा गुण कोणत्याही गोलंदाजीवर खेळण्यात त्याचा हातखंडा होता. पुढे जाऊन फटके मारण्याला तो कधी डरत नसे. अगदी लेगब्रेक गोलंदाजीसुद्धा! कव्हर ड्राईव्ह, पूल व स्क्वेअर कट्सचे फटके मारण्यात तो वाकबगार होता. हुकची त्याची 'मोनॉपॉली' होती. मजबूत मनगटाचा आणि

दांडग्या आत्मविश्वासाचा फलंदाज म्हणून त्याचा लौकिक होता. नजर घारीसारखी स्वच्छ आणि तीक्ष्ण. ह्या सर्व गुणांमुळे मांजरेकर फलंदाजीत नेत्रदीपक यश मिळवू शकला.

पण ज्या गुणांनी मांजरेकरला अमाप लोकप्रियता दिली त्याच अमाप लोकप्रियतेमुळेच त्यांच्या फलंदाजीतील कौशल्याचा ऱ्हास झाला असंच म्हटलं पाहिजे. ह्यामुळे तो फलंदाजीत सातत्य ठेवू शकला नाही. अष्टपैलुत्व व प्रयत्नशीलता ह्या गुणांचा त्याच्यामध्ये अभाव होता. म्हणूनच काळाची पावले ओळखून त्याने क्रिकेटच्या इतर अंगांत निपुणता मिळविली नाही. उत्कृष्ट क्षेत्ररक्षण म्हणा वा गोलंदाजी म्हणा, ह्या बाबतीत त्याने उम्रीगरचा कित्ता गिरवायला हवा होता. म्हणजे आणखी काही वर्षे तो भारतीय संघाला हवासा वाटू शकला असता. ऐन उमेदीत मांजरेकरची अवास्तव स्तुती केली गेली, त्यामुळे तो सुधारला नाहीच. त्याचे हुकमी ' फुटवर्क ' ही सदोष भासू लागले. त्याचा ' फॉर्म ' संपू लागला, तेव्हा त्याचे शरीर मात्र ' फॉर्म ' घेऊ लागले व ब्रेबॉर्न स्टेडियमवर सामना चालू असताना अनेक शौकीन त्याला ' जाडया ' म्हणून लाडीकपणे हाक मारू लागले.

प्रत्येक क्रिकेटपटूच्या आयुष्यात एखादा सामना असा असतो की तो केवळ त्याचाच सामना ठरतो व सुवर्णाक्षरात इतिहासात त्याचा गौरव होतो. इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या विनू मन्कडचा, ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळलेल्या जसू पटेलचा, असा गौरव यापूर्वी झालेला आहे. फक्त फलंदाजीची ' स्पेशॅलिटी ' असलेल्या मांजरेकरच्या आयुष्यात हा सुदिन का उगवला नाही ? खेळाला लागणारी शिस्त व निष्ठा आणि इतर आवश्यक असलेले गुण त्याने न पाळल्यामुळे त्याचे गुण नाहक वाया गेले. शिस्तपालनासंबंधी त्याने १९५९ च्या इंग्लंड दौऱ्यात इतकी बेशिस्ती दाखविली की बोर्डाने त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाचा इलाज केला. एक मातबर फलंदाज म्हणून लौकिक मिळविणाऱ्या मांजरेकरने ही पाळी का आणावी ? अलीकडे मांजरेकरसंबंधी एक प्रश्न अचूक मनात डोकवायचा. तो हा की सांप्रत भारतीय संघात त्याच्याइतका ' जुना आणि जाणता ' खेळाडू नाही. तरीपण कसोटी सामन्यांत हा बहुतेक कंटाळवाणी फलंदाजी का करतो ? अलीकडे तर त्याचा खेळ फार सावध, संथ संरक्षणात्मक होत असे. त्याला स्वतःला हा गुण वाटला असेल, पण तो नेमका दोष ठरला. खरं म्हणजे मांजरेकरने नवीन पिढीला कोणता धडा घालून दिला आहे ? उलट त्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठवणारा खेळाडू कधीही स्वैरपणे फटकेबाजी करणार नाही !

क्षेत्ररक्षणातही मांजरेकर अलीकडे ढेपाळला होता. तो शरीराने इतका स्थूल झाला होता, की त्याला धड पळताही येत नसे. मांजरेकरने चेंडू अडविणे हा विनोद ठरत होता ! कित्येक वेळा तो जागचा हलतही नसे, पण त्याचे गचाळ क्षेत्ररक्षण त्याच्या उत्कृष्ट फलंदाजीमुळे खपून जात असे.

## केवळ धंदेवाईक दृष्टी

मांजरेकर हा बोलूनचालून धंदेवाईक खेळाडू होता. तो प्रथम स्वार्थ पाही! पुढच्या कसोटी सामन्याची बेगमी करून ठेवी आणि मग स्वैरपणे खेळे, असे त्याच्याबद्दल म्हटल्यास काय चूक आहे? गेल्या तीन चार वर्षांत तर त्याच्या ह्या गुणाने फार उचल खाल्ली होती. तो नेमका एक कुठलातरी कसोटी सामना उत्कृष्टपणे खेळत असे. कधी शतक झळकावे तर कधी ७०-७५ धावा. झक मारीत बोर्डाला इतर सामन्यांसाठी त्याला घ्यावा लागे. ह्या वर्षीही न्यूझीलंडविरुद्ध मद्रास येथे खेळताना त्याने २०० मिनिटांत १०२ धावा केल्या, पण या वेळी त्याची युक्ती बोर्डाने ओळखली असावी. इतर सामन्यांत त्याला वगळण्यात आले. त्यामुळे मांजरेकर मात्र विनाकारण भडकला, इतका की परिणामी तो स्वत: होऊन रागाने निवृत्त झाला.

मांजरेकरसंबंधी आणखी एक प्रश्न मनात डोकावतो, तो हा की मांजरेकरने एखादा नवीन खेळाडू तयार केला आहे का? मुळीच नाही! आपल्या १५ वर्षांच्या कारकीर्दीत त्याला हे शक्य होतं, पण त्याने तसा प्रयत्नच केला नाही असं वाटतं. सुभाष गुप्तेला दुसरा 'गुप्ते' निर्माण करता आला नाही, अगदी तसेच मांजरेकरचे झाले. हजारेने बोर्डेला तयार केले, मर्चंटने आपटे बंधूंना तालीम दिली, मन्कडने स्वत:च्या मुलाला तयार केले. मांजरेकरने कोणाला तयार केले? कोणाला नाही!

आता एवीतेवी मांजरकर निवृत्त झाला आहे. त्याच्या निवृत्तीमुळे शास्त्रशुद्ध खेळणाऱ्या खेळाडूंची परंपरा संपली, असं निश्चितपणे म्हणता येईल. एक बोर्डेचा अपवाद सोडला तर सांप्रत भारतीय संघात हजारे, मर्चंट, उम्रीगर व मांजरेकर यांनी कष्टाने चालविलेली शास्त्रशुद्ध खेळाची परंपरा कोण टिकवून आहे?

## रीडकृत गुणगौरव

निवृत्त झाल्यावर मांजरेकरला न्यूझीलंडचा कप्तान व जगातील अव्वल दर्जाचा फलंदाज जॉन रीड याने जे मानपत्र दिले ते योग्यच आहे. रीड म्हणतो, "कसोटी सामन्यांतून ह्यापुढे विजय मांजरेकर दिसणार नाही, म्हणून मला स्वत:ला फार वाईट वाटत आहे. गेले एक तप तो भारताचा एक यशस्वी खेळाडू होता. त्याचे फलंदाजीचे 'टेक्निक' अचूक आहे व तो मारीत असलेले फटके नेत्रदीपक असतात. सांप्रत मांजरेकरशिवाय निवड समितीचे चालत असेल, तर त्यांच्यासारखे भाग्यवान कोणी नाही, असंच म्हटलं पाहिजे..." मांजरेकरचा इतका यथार्थ गौरव दुसरा कोणीच करू शकला नसता असंच म्हटलं पाहिजे.

मांजरेकरच्या निवृत्तीमुळे एक पर्व संपले. क्रिकेट-शौकिनांचा लाडका "जाड्या" आता त्यांना कसोटी सामन्यांत दिसणार नाही!

ललित + शास्त्रीय लघुलेख

हसतमुख, विनोदी व शांत स्वभावाच्या माणसाच्या वाटेलाही न जाणारा रोग

# रक्तदाब ... ब्लडप्रेशर

डॉ. पु. शं. वैद्य

विशिष्ट वयात माणसाला विशिष्ट रोग उद्‌भवत असतात. मुडदुस व बाल्यावस्था, हिस्टेरिया व तरुणावस्था आणि रक्तदाब व वृद्धावस्था या मानवी जीवनातील अटळ जोडया असतात. परंतु कधीकधी नुकत्याच जन्मलेल्या मुलालाही रक्तदाबाचा विकार झालेला आढळतो व त्यामुळे त्याच्या आईवडिलांचाही रक्तदाब काळजी-मुळे वाढीला लागतो !

माणसाचे वय वाढले, की रक्तदाब वाढतो याचे कारण माणसाची ' साठी बुद्धी नाठी ' होते हेच खरं ! स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या बाबतीत या रोगाचे प्रमाण अधिक आढळते; याचे कारणही उघड आहे ! पुरुषांच्या आयुष्यभर अनेक कट-कटी निर्माण करणारी स्त्रीच असते. त्यामुळे प्रत्येक पुरुषाचे–विशेषत: विवाहित पुरुषाचे–ब्लडप्रेशर हमखास वाढलेले दिसते ! तारुण्यात पुरुषाचा होणारा प्रेमभंग घ्या, विवाहानंतर ही साडी आणा, तो दागिना आणा, असा पिच्छा पुरविणारी गृहिणी घ्या, किंवा वधूपित्याच्या डोक्यावर सतत ' टांगती तलवार ' निर्माण कर-णारी उपवर कन्या घ्या; फार कशाला, तलवारीच्या पात्यासारखी धारदार जीभ असणारी सासू घ्या ! ... या सगळयांची परिणती पुरुषांचे ब्लडप्रेशर वाढण्यात होते !

माणसातील षड्‌रिपूंपैकी ' क्रोध ' या विकारातून ' ब्लड–प्रेशर ' हा रिपू जन्माला येत असतो ! ' कामातून अपत्यसंभव ' तर ' क्रोधात् भवति रक्तदाब: ' असं किंचित संस्कृतात म्हणायला हवं ! आणि म्हणून ' क्रोध धरू नको तू मानवा ' असे ज संतमहंत आपणास अनादी कालापासून सांगत आले आहेत, त्याची महती चटकन पटते !

तापट स्वभावाच्या माणसाचा हा रोग सावलीसारखा पिच्छा पुरवतो. उलट हसतमुख, विनोदी व शांत स्वभावाच्या व्यक्तीच्या शरीरात तो रोग औषधापुरताही सापडत नाही ! कुठलाही विनोदी लेखक वा वक्ता पाहा ! त्याला कधी ब्लडप्रेशर झालं आहे, असं तुम्हाला चुकूनही दिसणार नाही !

सतत कसली तरी चिंता, काळजी करीत बसण्याची काही काही लोकांना सवय असते; तीही ब्लडप्रेशरच्या जन्माला कारणीभूत होत असते ! सम्राट नेपोलियनला काळजी काय कमी का होती ? तुम्हा-आम्हा सामान्य माणसांहून ती कितीतरी पटींनी अधिक होती ! परंतु तो इतका शांत स्वभावाचा व थंड डोक्याचा होता, की त्याचे नाडीचे दर मिनिटाला पडणारे ठोके व रक्तदाब ही दोन्हीही सामान्य माणसाहून कितीतरी कमी होती. मला वाटते, याच गोष्टीत त्याचे असामान्यत्व सामावलेले आहे !

## मनावरील वाढता ताण :

एक काळ असा होता, की माणसाच्या अंगात भरपूर रक्त होते व ते 'प्रेशर' शिवाय अनिर्बंधपणे वावरत असे. आज मात्र काळ असा आला आहे, की माणसाच्या जीवनात काय किंवा शरीरातील रक्तवाहिन्यांत काय, अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. अपेक्षाभंग, प्रेमभंग, अपुरे वेतन, वाढती महागाई व अफाट प्रजोत्पत्ती इत्यादी अडचणींच्या चक्रव्यूहात माणूस सापडल्यामुळे त्याच्या मनावरील प्रेशर वाढले आहे व त्याची परिणती रक्तदाब वाढण्यात झाली आहे. परंतु आज माणसाच्या अंगात रक्तच इतकं कमी झालं आहे, की त्याला हा वाढलेला रक्तप्रवाहांतील दाब अजीबात सहन होत नाही !

रक्तवाहिन्यांतील लवचिकपणा (Elasticity) कमी होऊन त्यांच्यातील ताठरपणा (Rigidity) वाढला, की रक्तदाब वाढतो, असं आधुनिक वैद्यकशास्त्राचं म्हणणं आहे !

जीवनातही हाच अनुभव येतो म्हणा ! माणसाने या जीवन-संग्रामात लवचिकता ठेवली आहे, तोवर त्याचा निभाव लागू शकतो. उलट, खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी असं मिशीला तूप लावून माणूस बोलू लागला, तर जीवनात त्याचा 'खिमा' होतो ! तुकोबाने वर्णन केलेल्या लव्हाळ्यांची लवचिकता त्याने अंगी आणली, तरच त्याचा निभाव लागतो; नाहीतर असंख्य आपत्तींच्या महापुरात ताठरपणे उभा राहणारा मानव जमीनदोस्त होतो ! पण या नियमालाही अपवाद असतो तो लोकोत्तर पुरुषांचा ! अलौकिक सौंदर्य, प्रखर बुद्धिमत्ता किंवा अगणित संपत्ती लाभलेल्या महाभागांनी जीवनात ताठरपणा दाखविला; तरी त्यांना तो खुलूनच दिसतो ! परंतु सर्वसामान्य माणसांनी अंगी लव्हाळ्याची लवचिकता भिनवावी हेच उत्तम !

माणसाच्या सर्वसामान्य (Normal) रक्तदाबाची लक्ष्मणरेषा ठरलेली असते! त्या विशिष्ट रेषेच्या पलीकडे गेलेला रक्तदाब औषधांनी खाली आणता येतो! परंतु रक्तदाब त्या लक्ष्मणरेषेच्या खाली येणं हे पेशंट कायमचा वर जाण्याचं लक्षण असतं! सारांश, ब्लडप्रेशर मोजण्याच्या यंत्रातील पाऱ्याचं अधःपतन हे रोग्याचे कायमचे 'उर्ध्वगमन' करणार, असं ध्वनीत करीत असतं! अधःपतीत झालेल्या माणसाला जीवनात पुनः वर आणणं जितकं कठीण, तितकंच अधःपतीत रक्तदाब असलेल्या रोग्याला पुनः पृथ्वीतलावर आणणं फार कठीण जातं! उलट फार वर गेलेल्या माणसाला जीवनात (त्याचे पाय खेचून) खाली आणणं जितकं शक्य असतं, तितकंच फार वर गेलेल्या रक्तदाबाला औषधांचा मारा करून खाली आणणं शक्य असतं!

कुठल्याही वृद्ध इसमाला 'तुमचं ब्लडप्रेशर Normal' आहे,' असं म्हटलं की आनंद होतो; असा आजवर माझा अनुभव आहे. म्हणून दवाखान्यात साधी मलमपट्टी करायला आलेल्या कुठल्याही वृद्ध गृहस्थाचं प्रथम मी ब्लडप्रेशर पाहतो; कारण त्याच्या समाधानाचा पारा त्यामुळे वर चढतो, असं माझं निरीक्षण आहे. कुठल्याही स्त्रीला तुम्ही फार सुरेख आहात व तुमचा 'बबड्या' फारच गोड आहे, असं म्हटलं, की बरं वाटतं ना? त्यातलाच प्रकार आहे हा! मनुष्यस्वभाव आहे हा!

इतर प्राण्यांत रक्तदाबाचा विकार नसेल; अशा माझ्या प्रामाणिक समजुतीला परवा आमच्या बंडोपतांच्या कुत्र्याने जबरदस्त धक्का दिला! 'आमचा टॉमी ब्लड-प्रेशरने मेला वाबूराव! असं घरचं माणूस जावं तसं सद्गदित होऊन जेव्हा ते म्हणाले, तेव्हा मनात मी म्हटलं—भर रस्त्यात रोमान्स करणारा हा रोडसाईड रोमियो, मन मानेल तसा मुभुत्कार करणारा स्वतंत्र वृत्तीचा समर्थांचा हा प्रिय प्राणी, कुठल्याही विधींच्या बाबतीत कुठलाही विधिनिषेध न पाळणारा हा दत्तात्रयाचा जीवलग दोस्त, शंभरटक्के माणसाळला आहे हेच खरं! संगतीने वाण नाही पण गुण लागतो म्हणतात, तसं माणसाच्या संगतीत राहून समस्त श्वानमंडळींना रक्तदाबाचा विकार जडला आहे हेच खरं!

● ● ●

# राजकीय हत्या !

## [ म. गांधी वगळून ]

जगात आज नाही म्हटले तरी दररोज, कमीत कमी दोन तीन हजार तरी खून पडत असतील. कदाचित जास्तच. पण या खुनांचा अधिक सढळपणे आकडा कल्पिण्याचेदेखील माणसाला धाडस करवत नाही. परंतु ही खुनी प्रवृत्ती जेव्हा एखाद्या राजकीय पुरुषाचा घात करते, तेव्हा या प्रवृत्तीची चव सर्वव्यापी होते. महात्मा गांधींचा खून झाला तेव्हा त्या प्रवृतीच्या प्रतिक्रियेचे रौद्र स्वरूप आपल्याला जाणवले, ते इतके की प्रा. रा. का. बर्वे यांनी आपल्या ' राजकीय हत्या ' या पुस्तकात महात्मा गांधीच्या वधाला अर्धचंद्र दिलेला आहे.

या प्रवृत्तीची दहशत किती बलवत्तर आहे हे यावरूनदेखील लक्षात येईल. त्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ्. केनेडी यांचा खून झाला. अगदी १९६३ सालातली ही गोष्ट, पण त्यांच्या खुनाचा इतिहास बर्वे यांनी साद्यंत सांगितला आहे. त्यात एक विसंगती निश्चितच दिसते. या विसंगतीतील रहस्य काय असावे याचा शोध आपल्यासारख्या लोकशाही राष्ट्रातील नागरिकाने जरूर घेतला पाहिजे. हाती काय येते ते ज्याचे त्याने तपासावे !

मात्र ही एक उणीव या पुस्तकातील सोडून दिली तर मराठीत प्रसिद्ध झालेले हे एक अभिनव पुस्तक आहे. ते जेवढे वाचनीय आहे तेवढेच ते चिंतनीयही आहे. या पुस्तकात, गंगाधर शास्त्री पटवर्धन यांच्यापासून अब्राहम लिंकन, ट्रॉटस्की, यु आँग सॉन, हॅमरशील्ड, केनेडी, सॉलोमन बंदरनायके यांच्यापर्यंत राजकीय व्यक्तींच्या खुनांची कथा स्वतंत्र रीतीने सांगितलेली आहे.

त्या त्या वेळचा काळ, परिस्थिती, राजकीय महत्त्वाकांक्षा, सामाजिक विषमता व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना यांचा पूर्ण अभ्यास करून प्रा. बर्वे यांनी वरील पुरुषांचे कर्तृत्व उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लिऑन ट्रॉटस्की यांच्या खुनाची हकीकत सांगताना तर आपण एखादे उदात्त व्यक्तिमत्त्व असणाऱ्या पुरुषाची कथाच वाचीत आहोंत, असे वाटते; इतकी ती त्यांनी सर्व धागेदोरे यशस्वीपणे हाताळून उभी केली आहे.

केनेडींच्या खुनाची हकीगत तुम्हा–आम्हा सर्वांना परिचितच आहे, इतकी ती ताजी आहे. परंतु इथेही बर्वे यांनी त्या खुनामागचे सर्व धागेदोरे परिश्रमपूर्वक प्रयत्न करून, अनेक ठिकाणाहून वाचन करून जमा केलेले आहेत आणि तरीही ते सारे वाचून संपविल्यावर केनेडींच्या खुनाचे रहस्य शिल्लक उरतेच ! राजकीय

खुनांचे हे असेच आहे. राजकीय हत्या होतात. खुनी सापडतो. त्यावर खटला भरला जातो. त्याला शिक्षाही होते. परंतु तरीही या सर्व प्रकारामागे पुन्हा काही गूढ हे शिल्लक उरलेलेच असते. व्यक्तीची राजकीय कारणासाठी झालेली हत्या ही जितकी भीषण, दारुण आणि दु:खद असते, तेवढेच त्या हत्येच्या पाठीमागे दडलेले गूढही (राजकीय गूढ) तेवढेच भीषण असते. लिंकन यांचा खून ज्या जॉन विल्किन्स बूथ या प्रख्यात नटाने केला, त्या खुनीच्या बाबतीतही असेच एक घाणेरडे राजकीय गूढ कायम राहिलेले आहे. प्रा. बर्वे यांचा लिंकनच्या खुनावरील लेख वाचताना हे स्पष्टपणे जाणवते. मनाला चुटपुट लागते. क्षणभर मनात असेही येऊन जाते, की या खुनी माणसापेक्षाही त्या खुनाचे रहस्य दडवून ठेवण्यात, त्याच्याभोवती गूढतेचे वातावरण निर्माण करणाऱ्या त्यावेळच्या सत्ताधारी राज्यकर्त्यांचा हात असल्याचा जो संशय निर्माण होतो, तोच फार भयानक आहे ! कारण त्यामुळे सामान्य जनतेचा राजकीय आणि सामाजिक निष्ठेवरील विश्वासच उडून जातो. एखाद्या व्यक्तीच्या बळीपेक्षा या निष्ठांचा बळी घेणे ही गोष्ट अधिक भयानक वाटते.

एखाद्या व्यक्तीचा कुठल्या तरी वैयक्तिक राजकारणावरून बळी घेणे निराळे आणि एखाद्या राष्ट्राच्या उत्कर्षाचे, आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीचा बळी जाणे निराळे! लोकशाही राज्यामध्ये तर राजकीय नेतृत्व करणारी व्यक्ती ही त्या राष्ट्राची मानबिंदूच ठरलेली असते. अशा मानबिंदूचे अस्तित्व एखादी बंदुकीची गोळी जेव्हा एका क्षणात संपवून टाकते, तेव्हा मानवी जीवनावरील विश्वास उडाल्याशिवाय राहात नाही. त्या त्या काळी त्या त्या व्यक्तीचा खून म्हणजे त्या राष्ट्राने विकसित केलेल्या आशाआकांक्षांचाच खून ठरतो. अर्थात अशा एखाद्या पिसाटाच्या बंदुकीवाटे सुटलेल्या गोळीने त्या व्यक्तीचे वैयक्तिक जीवन समाप्त होऊ शकेल, परंतु त्याने समाजमनामध्ये पेटविलेल्या वैचारिक जीवनाची ज्योत विझू शकत नाही. लिंकन, गांधी, केनेडी आणि दाग हॅमरशूल्ड यांनी पेटविलेल्या आपल्या विचारांच्या ज्योती अजूनही विझलेल्या नाहीत, हे आपण पाहात आहोच. अर्थात राजकीय हत्या ही आपल्याला अपेक्षित नसलेल्या विचारांना नष्ट करण्याचे साधन होऊ शकत नाही.

विचारांना चालना देणारे एक उत्तम पुस्तक प्रा. बर्वे यांनी लिहिले आणि ज्ञानराज प्रकाशन यांनी ते प्रसिद्ध केले, याबद्दल दोघांचेही अभिनंदन करायला हवे. मात्र महात्मा गांधी व पाकिस्तानचे एक पंतप्रधान मरहूम लियाकत अली खान यांच्या वधाची हकीकत या पुस्तकात नाही ही गोष्ट फक्त प्रकाशकांचा धोरणीपणा दाखवते व वाचकांना खटकते.

*वि. शं. पारगावकर*

[ राजकीय हत्या, प्रा. रा. का. बर्वे, ज्ञानराज प्रकाशन, पुणे २. किंमत चार रुपये ]

# राजा शिवछत्रपती

## तृतीय आवृत्तीचा प्रकाशन-सोहळा

विघ्ने फक्त नकटीच्या लग्नालाच येतात, असे नाही. अगदी सुबक, ठेंगण्या रूपवतीच्या लग्नालाही प्रसंगी विघ्ने येतातच. त्यातून आपला देश म्हणजे विघ्नांना सतत निमंत्रण असावे, असा भोळाभाबडा. ब. मो. पुरंदरे यांच्या 'राजा शिवछत्रपती' या लोकप्रिय चरित्र–इतिहासाची तिसरी आवृत्ती प्रकाशित होण्याची तिथी ठरली आणि याचा प्रत्यय आला. सहा महिन्यांपूर्वीच प्रसिद्धीचा दिनांक गृहीत धरलेला असताना कागदाची अडचण अनपेक्षितपणे निर्माण झाली. जुन्या कागदपत्रांच्या या भरजरी लेखकाला हवा तसा नवा कोरा कागद मिळेना. प्रकाशन लांबणीवर पडत गेले. ज्यांनी प्रेमाने पुनःपुनः चौकशी केली, त्यांना लेखकाने थट्टेत सांगितले, "गंधर्वांची नाटकं पाहायचीत न? थोडा उशीर लागायचाच." अखेर अडचणी संपल्या. ३ मे १९६५ मुहूर्त ठरला. ना. यशवंतराव चव्हाण हे प्रमुख पाहुणे ठरले. साताऱ्च्या छत्रपती सुमित्राराजे यांना निमंत्रण गेले. ब. मो. पुरंदरे यांनी लिहिलेल्या "महाराणी जिजाबाई" या सौ. सुनीताबाई देशपांडे यांच्या एकपात्री चरित्र–कथनाचा पहिला प्रयोग प्रकाशनाच्या दिवशीच करण्याचे पु. ल. देशपांडे यांनी जाहीर केले. दुधात साखरेसह केशरही पडले.

### अगत्य असो द्यावे

३ मे, १९६५ रोजी सायंकाळी ६॥ वाजता रवींद्र नाटयमंदिर–मुंबई येथे 'अगत्य असो द्यावे' अशी निमंत्रणे रवाना झाली. समारंभाचा ऐतिहासिक थाट नटू सजू लागला. १६६५ चा निवेदक न् १९६५ चे श्रोते असा सगळा मुखवटा ठरला. साताऱ्याहून छत्रपती राणीसाहेबांची परंपरागत छत्रचामरे याप्रसंगी मुंबईला आणण्याचे राणीसाहेबांनी मान्य केले.

इतक्यात कंजारकोट येथे पाकिस्तानने दगाबाजी केली. बगलेत दोन शत्रू आणि देशात शत्रूंचे असंख्य बगलबच्चे ! ना. संरक्षणमंत्री येऊ शकत नाहीत, ही बातमी आदले दिवशी दूरध्वनीवरून कळली.

प्रकाशन शिवचरित्राचे असल्यामुळे संरक्षणमंत्री आघाडीवरील हाकेमुळे येऊ शकत नाहीत, या वार्तेने फारसा निरुत्साह वाटलाच नाही. श्री. पुरंदरे यांनी आपल्या भाषणात जेव्हा "संरक्षणमंत्री आघाडीवर शिवचरित्राचेच प्रकाशन करीत

आहेत," असा उल्लेख केला तेव्हा श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून याच भावनेला साथ दिली.

रवींद्र नाट्यमंदिराच्या प्रवेशद्वारापाशी कोल्हापुरी साफा बांधलेले चरित्र-लेखक पुरंदरे हे जातीने आलेल्या पाहुण्यांचे प्रेमाने स्वागत करीत होते. प्रवेशद्वारापाशी अत्तर व गुलाबपाण्याच्या शिडकाव्याने प्रफुल्लित झालेल्या निमंत्रितांना हा लग्न-सोहळा तर नाही ना, असा काहीसा भ्रम होत होता. कारण आगत-स्वागत सुरू असताना सनईचे सूर वातावरण भारून टाकीत होते. नटवर्य बाबुराव पेंढारकर, श्री. वसंतराव जोगळेकर, सौ. सुमतीबाई जोगळेकर, प्रा. अनंत काणेकर, श्री. ना. पेंडसे, दिनानाथ दलाल, गंगाधर गाडगीळ, गजानन जागिरदार, अच्युत बर्वे, श्री. रा. ज. देशमुख, आनंद प्रेसचे मालक श्री. य. गो. जोशी आदि विविध क्षेत्रांतील मंडळी प्रामुख्याने आली होती.

ठीक साडेसहा वाजता छत्रपती सुमित्राराजे यांचे आगमन झाले व कार्यक्रमाला सुरवात झाली.

पडदा वर गेला. प्रेक्षकांची मन शिवकालात खेचली गेली. रंगमंचावर दरबार होता. छत्रपतींची छत्रचामरे रंगमंचावर झळकत होती, राणीसाहेब आसनावर आल्या, शिंगांच्या ललकाऱ्यांनी वातावरण दुमदुमून गेले. पु. ल. देशपांडे यांनी चरित्रलेखक पुरंदरे व राजहंस प्रकाशनाचे श्री. ग. माजगावकर यांचा प्रेक्षकांना परिचय सांगितला व कार्यक्रमाला सुरवात झाली.

## प्रत्येक मराठी घरात हे शिवचरित्र जावे

पु. ल. नी आपल्या भाषणात ब. मों. चा परिचय करून देताना सांगितले,

"शिवाजीराजांची पावले जेथे जेथे लागली अशी देशातील एकही जागा नाही, की जेथे जाऊन पुरंदऱ्यांनी तेथील धूळ मस्तकी लावली नाही. शिवाजीराजे आग्र्याहून सुटून ज्या मार्गाने महाराष्ट्रात आले, तो सर्व मार्ग त्यांनी चालून पाहिला आहे. शिवचरित्रावर आणि चारित्र्यावर प्रेम याखेरीज त्यांना दुसरा ध्यास नाही. जीवनाचे प्रयोजन सापडलेल्या फार थोड्या माणसांमध्ये ते एक आहेत. शिव-चरित्रच लिहीन—हे एकच स्वप्न त्यांनी सोळाव्या वर्षी पाहिले आणि गेली १८, १९, २० वर्षे याच एका उद्योगात त्यांनी तन—मन झिजवले आहे. सासवडाने महा-राष्ट्राला दोन मोठी माणसे दिली. एक आचार्य अत्रे व दुसरे बाबा पुरंदरे! आज त्यांनी फेटा वगैरे बांधून कितीही पोक्तपणाचा आव आणला असला, तरी ते काही खरं नाही! मी त्यांचा उल्लेख अजून 'मुलगा' असाच करणार आहे. मला पुष्कळ-वेळा असे वाटते, की शिवचरित्र लेखनाऐवजी त्यांनी रहस्यकथा लिहिल्या असत्या, तर नसतं का सरकारी बक्षीस मिळालं? त्यांचा हा इतिहासलेखनाचा प्रचंड उद्योग कुठल्याही सरकारी मदतीवाचून चालू आहे. त्याकरता त्यांनी दोन हजारांवर व्याख्याने दिली आहेत. या उद्योगासाठी पैसा मिळवण्याचा दुसरा मार्गच त्यांना

उपलब्ध नव्हता. त्यांच्या या उद्योगाला समाजाने प्रचंड दाद द्यावी व तशी ती दिल्याशिवाय मराठी माणसे राहणार नाहीत, असा माझा विश्वास आहे. ओघवत्या भाषेत लिहिलेले हे शिवचरित्र आहे. काय सांगू ? प्रत्येक शिखाच्या घरात जसा ग्रंथसाहेब असतो, त्याचं वाचन केलं जातं न् तसे प्रत्येक मराठी घरात हे शिवचरित्र वाचले गेले पाहिजे. त्यावाचून अन्य गती आता आपल्याला नाही आहे ! मी आता मराठी बोलतो आहे अन् आपण ते ऐकता आहात न् याचं कारण शिवाजीराजा होऊन गेला !! हे चरित्र वाचणारा माणूस कधीही म्हातारा होणार नाही. जीवनाला सतत तकवा देणारे असे हे चरित्र आहे. मी पुस्तकाची जाहिरात करण्यासाठी हे सांगत नाही. त्याची त्याला गरजच नाही मुळी. हा नुसता इतिहास नाही. जगावे कसे हे सांगणारा हा ग्रंथ आहे."

## चरित्रलेखकाची भूमिका

लेखकाच्या परिचयानंतर चरित्रलेखक श्री. पुरंदरे यांनी आपल्या चरित्रलेखनामागची भूमिका विशद करताना सांगितले,

"काहीजण विचारतात, "तीनशे वर्षांपूर्वीची ही मढी आता का उकरता ?" काय उत्तर द्यावयाचे याला ? रामाच्या, कृष्णाच्या, चाणक्याच्या मनात जे होते, ते कृतीत उतरलेला शिवाजी हा एकच महापुरुष आहे. एखाद्या प्रचंड भूकंपात सर्वच्या सर्व नष्ट झाले, तरी एकच गोष्ट शिल्लक राहिली पाहिजे— 'शिवाचरित्र.' ही एकच अशी शक्ती आहे, जी पुन: राष्ट्र घडवील. परदेशांतून इतिहासाचे जागरण कटाक्षाने घडवले जाते. नेपोलियनची समाधी अशी बांधली आहे, की ती पाहायला येणाऱ्या नृपालाही मान वाकवून आत जावे लागते. रशियासारख्या कम्युनिस्ट देशात लेनिनच्या थडग्याभोवती हातात फुले घेऊन अहोरात्र दर्शनार्थ हजारोंच्या रांगा असतात आणि येथे काय ? ज्या ठिकाणी जिजाबाईसाहेबांची समाधी आहे, तेथे आज दिवसाउजेडी घामणी फिरतात. गिधाडांनी आणि घारींनी खाल्लेल्या श्वापदांची हाडके तिथे पडलेली असतात. हे पाहिले, की मन कष्टी होते. माझी अपेक्षा फार नाही. निदान या जागा स्वच्छ ठेवा. परवाच आपले मुख्यमंत्री वसंतराव नाईक रायगडावर चालत वर आले न् बरोबरच्यांची पंचाईत करून ठेवली. त्यांनी हे सर्व पाहिले. सरकार या बाबतीत आता जागे होत आहे, हे मोठे सुचिन्ह आहे. माझी खात्री आहे, आपल्याकडेही इतिहासाचे जागरण झाल्याखेरीज राहणार नाही. आज तर त्याची फारच गरज आहे. शिवाजीराजांनी मालवणच्या किनाऱ्यावर जंजिरा बांधण्याचा संकल्प केला; परंतु भूमिपूजनाला ग्रामजोशी येईनात. मुसक्या बांधून आणले तेव्हा बोलते झाले, " भूमिपूजन करून आपण निघून जाल; पलीकडे पोर्तुगीजांचे ठाणे आहे. ते येथे येऊन माझ्या घरादारावर नांगर फिरवतील, म्हणून येत नव्हतो." महाराजांनी ओळखले, की सरहद्दीवरचा माणूस हा भीतिग्रस्त

असणे ही स्वराज्याची बेअब्रू होय. सरहद्दीच्या शेवटच्या रेघपर्यंत उगवणारी गवताची काडी ही देशातले गायवासरू सुखाने खाऊन परतले पाहिजे. ज्यांना सरहद्दी सांभाळता येत नाहीत, ते राज्यकर्ते नादान होत. शिवाजीराजांनी हे ओळखले. त्यांनी ग्रामजोशाला सांगितले, 'सगळे स्वराज्याचे बळ जंजिऱ्यामागे उभे करतो. पोर्तुगीज ठाणी उठवून निघून जाईल. इकडे तो फिरकण्याची गोष्टच नको. असे हे शिवचरित्र आहे.

मी अंधभक्त नाही. शिवचरित्रात चार दोष असते तरी मी सांगितले असते. परंतु ते सापडले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. ज्याच्या चरित्रावर एकही डाग नाही, असे हे एकच चरित्र आहे. मला लोकांनी विद्वान, इतिहासकार, पंडित नाही म्हटले तरी चालेल, परंतु माझा निश्चय असा होता, की चरित्र अशा भाषेत लिहीन, की महाराजांचे जीवन प्रत्येक घरात वाचले गेले पाहिजे. असंख्य बखरी चाळून, ऐतिहासिक पत्रे पाहून, टाचा उंच करून शिकस्तीने हे चरित्र लिहिले आहे. दोष असतील. असले तर अगत्याने कळवा. मी पुढील आवृत्तीत सुधारणा करीन."

पुरंदरे यांचे निवेदन परिणामकारक होते. मासलेवाईक होते. परंतु त्यांच्या वक्तृत्वाची नेहमीची शीग त्यांनी गाठली नाही, नेहमीचे पुरंदरे दिसले नाहीत, ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

## पु. ल.–पुरंदरे युती


यानंतर सातारा छत्रपतींना शिवचरित्र अर्पण करण्याचा समारंभ तुताऱ्यांच्या निनादात पार पडला. श्रीमंत राणीसाहेब यांनी लेखकास आशीर्वाद देऊन, पु. ल. देशपांडे व ब. मो. पुरंदरे ही युती बरेच काही करू शकेल, असा आशावाद व्यक्त केला. राणीसाहेबांनी आपल्या भाषणात श्री. पुरंदरे यांना आवश्यक ती सरकारी मदत व्हायला पाहिजे, हे आग्रहाने सांगितले.

आभारप्रदर्शनाचा कार्यक्रम नेहमी कंटाळवाणा असतो, या नेहमीच्या समजुतीला सौ. निर्मला पुरंदरे यांनी धक्का दिला. आपल्या भाषणात त्यांनी नर्म विनोदाने बहार उडवली. त्या म्हणाल्या, "आमचे 'हे' जरा लहरीच आहेत. ही तिसरी आवृत्ती, पु. ल. देशपांडे यांचा कार्यक्रमाचा लकडा नसता तर इतक्या लवकर पार पडली असती, की नाही, हे सांगता येत नाही. ते काही आम्हाला दाद देत नाहीत. तेव्हा पु. ल. देशपांडे यांनी त्यांना असंच धाकात ठेवावे, अशी माझी त्यांना विनंती आहे."

प्रकाशन समारंभाचा हा कार्यक्रम संपला व मध्यंतर झाले व आता सर्वांना उत्सुकता होती–राजमाता जिजाबाईच्या स्वरूपातील सौ. सुनीता देशपांडे यांचे दर्शन.


**–'माणूस' प्रतिनिधीकडून**

छत्रपती श्री. सुमित्राराजे भोसले



पु. ल. – पुरंदरे युती बरेच काही करू शकेल....राणीसाहेब

सौ. निर्मला पुरंदरे यांचे बहारीचे आभारप्रदर्शन



सौ. पुरंदरे, श्री. ग. माजगावकर, पु. ल. देशपांडे व ब. मो. पुरंदरे

२

# □ तेजस्वी चरित्रकथन

चरित्रकथनास मातोश्री जिजाबाईसाहेबांना मानाचा पहिला मुजरा करून सुरवात झाली. पडदा दूर झाला. त्या आधीपासून नाटचमंदिरात एकनाथांचे भारूड गर्जत होते. 'दार उघड बये, दार उघड '. पडदा उघडल्यावर भवानीमातेचे दर्शन झाले. भवानी दृष्टीआड झाली. समोर सौ. सुनीता देशपांडे उभ्या होत्या. त्यांनी खणखणीत आवाजात सहाशे वर्षांपूर्वीच्या इतिहासकथनास सुरवात केली. विजयानगरचे साम्राज्य नष्ट झाले. यादवांचा पराभव झाला...संताची वाणी ऐकू येईना...सगळीकडे स्वाभिमानशून्यता, पराभूत मनःस्थिती असताना सिंदखेडच्या लखुजी जाधवरावांच्या पोटी जिजाबाईचा जन्म झाला. निवेदन पुढे सरकू लागले.

--निजामाच्या दरबारात दत्ताजी जाधव व संभाजी भोसले परस्परांच्या रक्ताचा घोट घेत होते. जिजाऊ सांगते, " रक्त गळून गेले होते. आता गळत होते अश्रू. जिजाऊने कोणासाठी रडावे ? भावासाठी, की दिरासाठी ती रडत होती. अवघ्या नादान महाराष्ट्रासाठी. "

सुनीताबाईंनी काही मिनिटांतच प्रेक्षकांचा कबजा केला. पुरंदऱ्यांचे शब्द आणि सुनीताबाईंचे अभिनयकौशल्य यांची जुगलबंदी सुरू झाली.

"नद्यांच्या घाटांवर धुणी धुता धुता स्त्रियांच्या हातातील सोने साखरेसारखे झिजे." " लगीन तर मल्लं थाटाचं झालं ! काहून नोय ! थो तर सिंदखेडचा राजाच होय न बाप्पा ! त्याले काय कमी ? कुकडं सिंदखेड कुकडं पुन्नं. वैनगंगेचे पानी पुन्याले चाललं गेलं बाप्पा ! "

जवळजवळ पंचाहत्तर वर्षांचा इतिहास सुनीताबाईंनी उभा केला ! सारे कथन तालासुरात चालले होते. आवाजातील बारकाव्यांचा पूर्ण उपयोग करून, चेहऱ्यावरचे हावभाव बदलून शिवचरित्रातील शिवाजीमहाराजांपासून औरंगजेबापर्यंत सर्व पुरुषांच्या, प्रत्यक्ष जिजाबाई, आदिलशहाची आई व सईबाई ह्या राजस्त्रियांच्या सर्व लकबी त्यांनी साकार केल्या. सुनीताबाईंच्या अभिनयकुशलतेचा कस लागला व त्या यशस्वी ठरल्या. त्यांच्या चेहऱ्यावर भाव बदलण्याचे सामर्थ्य विलक्षणच आहे. बेगमेची वाक्ये बोलताना त्यांनी केलेली शब्दांची अचूक फेक वाखाणण्याजोगी. सईबाई शिवाजीमहाराजांशी बोलत असतानाच्या प्रसंगात सईबाईची भूमिका जितक्या तन्मयतेने त्यांनी वठवली, की सईचा नाजुकपणा व निष्ठा अचूक भिडली. तितक्याच जोरकसपणे म्हातारा दादाजी कोंडदेव त्यांनी समोर उभा केला. एका स्त्रीने केलेला चरित्रकथनाचा हा पहिला प्रयत्न म्हणून त्यांच्या यशास अधिकच गुण.

एक गोष्ट जाणवत होती, की पार्श्वसंगीत व निवेदन यांचा पुरेसा उपयोग करून सुनीताबाईंना विसाव्यासाठी काही जागा ठेवणे अवश्य होते.

१५ मे १९६५

या कार्यक्रमात सुनीताबाईंनी कथन केले, परंतु त्यामागचे सर्व प्रयत्न पु. लं. चे मला वाटते, सुनीताबाईंनी उत्कृष्ट काम वठवले हे म्हणण्यात पु. लं. चे यश आलेच. नेपथ्य आणि प्रकाशयोजना शाम आडारकरांनी फार छान सांभाळली होती. एवढे मात्र खरे, की रवींद्र नाट्यमंदिरासारख्या सरकारी नाट्यमंदिरातही पुरेशी प्रकाशयोजनेची सोय नसल्यामुळे पु. लं.च्या कित्येक कल्पना ऐनवेळी ते समोर आणू शकले नसावेत. ती असती तर सुनीताबाईंचे धारदार कथन अधिकच उठावदार झाले असते.

श्री. ब. मो. पुरंदरे यांच्या लेखणीचा ओघवता जोरच असा. तीनशे वर्षांपूर्वीचा इतिहास सांगत असताना भूतकाळ व वर्तमानकाळ यांची अशी बेमालूम सांगड घातली, की सुनीताबाईंनी लीलया फेकलेल्या त्या वाक्यांना प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट मिळाला. "सरहद्दीवरचा शेवटचा माणूसही सुखाने नांदला पाहिजे. ज्या राज्यात असे असत नाही, ते राष्ट्र नेमळे ठरते.' "एकच घोष सुरू होता, खान–भोसले भाई भाई." अशा काही खास जागी भलतीच दाद मिळाली. "खान–भोसले भाई–भाई' ऐकल्यावर तर मुख्यमंत्री नाईक यांनाही हसू फुटल्याशिवाय राहिले नाही. शिवचरित्रातील सामान्यांना अज्ञात असलेल्या घटना त्या प्रयोगामुळे माहीत झाल्या.

१ : शिवाजी महाराज आदिलशहाच्या दरबारात गेले, परंतु त्यांनी कुर्निसात केला नाही, हा प्रसंग फारच तुटकपणे सांगितला गेला.

२ : जिजाबाईचे चरित्रकथन आहे, शिवचरित्रकथन नव्हे, असे असूनही बराचसा कालखंड फक्त शिवचरित्रकथनातच जातो. जिजाबाई मागे पडतात.

मराठी हृदयास भिडणारे व अत्यंत वेगळ्या प्रकारे हे इतिहासकथन आहे. एक विलक्षण देणे ब. मो. पुरंदरे, पु. ल. व सुनीताबाई या तिघांनी दिले आहे. मराठी माणसे याचे कौतुक केल्याशिवाय राहाणार नाहीत. इतिहासाचे जे जागरण पुरंदऱ्यांना अभिप्रेत आहे, त्या दिशेचा हा सर्वांत डोळस असा प्रयत्न आहे.

–सुरेश गजेंद्रगडकर

[ 'राजमाता जिजाबाई' या एकपात्री प्रयोगाचे चित्ररूप-
दर्शन 'माणूस'च्या पुढील अंकी देण्यात येईल. ]

व्ही. शांताराम चित्र

# गीत गाया पत्थरोंने

## फ्री स्टाईल करमणूक ! !

'सेहरा' चित्रपटापासून शांतारामबापूंच्या चित्रपटांची धास्तीच खाल्यामुळे शांतारामबापूंचा हा नवा 'बहुरंगी' चित्रपट सहसा पाहण्याचे धाडस झालेच नसते. परंतु या चित्रपटात जयश्री अपत्य, राजश्री शांताराम यांची नायिकेची भूमिका व एका नव्या नायकाचा (जीतेंद्र) चेहराही पाहण्याची संधी, यामुळे या भानगडीत अखेर आम्ही पडलोच आणि व्हायचे ते झाले. मंडळी, हे दगडाचे गाणे दगडांच्या देशातल्या आपल्या मराठी माणसांच्या अकलेबाहेरचे ठरले.

यातली पात्रे ही कुठल्या प्रांतातली आहेत ? यातले कुठले पात्र काय शिकलेले आहे ? यात जी माणसे श्रीमंत आहेत, ती श्रीमंत कशी झाली ? यांना कुठली तरी जातपात आहे का ? यांची संस्कृती कुठली ? असले बाळबोध प्रश्न कुणी विचारू नयेत. यातला नायक, ज्यात बरेचसे मुसलमान अन् तुरळक हिंदू आहेत, अशा जमावाला उद्देशून काही कारण नसताना राष्ट्रीय एकात्मतेवर एक व्याख्यान देतो. हे ऐकल्यावर वरील कुठल्याही प्रश्नाला उत्तर नसले म्हणजे राष्ट्रीय प्रवृत्ती असा शांतारामांचा संदेश आपल्याला समजतो. यातला तो जमाव इतका समंजस दाखवला आहे, की 'नेहरूंनंतर कोण' हा प्रश्न आपल्याला उगाच पडला होता, याची खात्री पटते.

आता गोष्ट ऐका. मराठी विषयाच्या प्राथमिक शाळेतील प्रश्नपत्रिकेत ज्याप्रमाणे काही सूचनात्मक वाक्ये देऊन गोष्ट तयार करायला सांगतात, तशाच पद्धतीने ही कथा मूळ कथालेखक के. ए. नारायण यांनी शांताराम यांना लिहून दिली असावी. ती अशी—

एक श्रीमंत माणूस, सतरा वर्षांपूर्वी मुलगी पळवलेली. मुलीला एक वेश्या वाढवते.. विकू पाहते. मुलीचे प्रेम शिल्पकारावर. शिल्पकार गरीब. प्रेम की कला हा प्रश्न ! शिल्पकाराची व बापाची ताटातूट. शिल्पकाराशी मुलीचे लग्न. अपत्य होण्यापूर्वी दोघांची ताटातूट. मूल कुणाचे हा संशय. असे हे थोडे थोडे शाकुंतल. अश्रू वगैरे. श्रीमंत माणसाची म्हणजे नायिकेच्या बापाची शिल्पकाराशी गाठ. संशयाचे निराकरण. सिनसिनरी वगैरे वगैरे.

## आता पटकथा सुरू

अजिंठा-वेरुळच्या लेण्यांत नायिका तिच्या ‘सहेल्या’ (सुमारे पाऊण डझन) व नायक आपल्या दोस्तांसह (प्रत्येक मुलीला एक याप्रमाणे). त्यांचे नृत्यगायन. नृत्य बेताचे आणि बेताबेताने. गायन पुष्कळ. नायक शिल्पकार. नायिकेची शिल्पे करू लागतो. तो दगड ताशीत असताना राजश्रीची असंख्य टेक्निकलर रूपे व गाणे. मध्येच ताजमहाल, हुमायून कबर वगैरे दृश्ये. मध्येच कनू देसाईंची कलाकुसर. मग कला व प्रेम यांवर पित्याचा व शिल्पकार पुत्राचा परिसंवाद.

मग चला दिल्लीला. नायक, नायिका, नायकाचा बाप सर्व मंडळी दिल्लीत कशी येतात, का येतात... शू: ! असले प्रश्न मधेमधे विचारायचे नाहीत.

असे फत्तरी गाणे अडीच तास पाहायचे. पुढचे दृश्य काय असेल, याचा नियम नाही. उमलणाऱ्या फुलांपासून तो ओसंडणाऱ्या उरोजापर्यंत काय वाटेल ते दाखवले जाईल. मध्येच तो श्रीमंत बाप सतरा वर्षे हरवलेल्या मुलीकरता सारखा रडताना दिसतो ! सतरा वर्षे सारखे रडत राहायचे... काय चेष्टा आहे ?

खलनायक आहे तर ? ज्याला नायिका विकली जाते. खलनायक मोठा डोकेबाज. नायिकेचा शिल्पकार नवरा बायकोला शोधीत घरी येण्याच्या सुमारास तो नायिकेच्या मुलाला मांडीवर घेऊन दूध पाजतो, बाटलीने. शिल्पकार नायक ते पाहतो. लगेच त्याला संशय येतो, की मुलगा काही आपला नसावा. गंमत आहे का नाही ? अशी या चित्रपटाची कथा गंमतीदार आहे.

राजश्रीला अभिनयाची चुणूक दाखवायला फारसा वाव नाहीच. परंतु जेव्हा ती स्वयंपाकिणीच्या वेशात आपल्या बापाच्याच घरी येऊन राहते, तेव्हा अस्तित्वात नसलेली भाषा ती फार चांगल्यारीतीने बोलते व ते सगळेच प्रसंग पुष्कळसे सजीव होतात. हे सर्व प्रसंग विनोदी आहेत व राजश्री विनोदी प्रसंगात आपल्या अभिनयगुणांची पावती देऊन जाते. जीतेंद्र या नवोदित नटाविषयी काय सांगावे ! दिसतो बरा. केस वळवायला एखादी फणी व नायिकेचा बापच दिग्दर्शक नाही अशा चित्रपटात नायकाची भूमिका मिळेल, तरच हा बरे काम करण्याची शक्यता आहे. नक्की सांगता येत नाही.

## इतर भूमिका

अभिनयात लक्षात राहण्यासारखी भूमिका आहे ती सी. एच्. आत्मा यांची. उमरखय्यामी वृत्तीची ही व्यक्तिरेखा त्यांनी चांगली उभी केली आहे. खय्यामच्या काव्याचा उपयोगही शांताराम यांनी उत्तमरीतीने करून घेतला आहे. बबलू याचे काम लहान तोंडी मोठे घास ज्याला कौतुकाचे वाटतात, त्यांना आवडेल. सिनेमातून ही लहान मुले काही वेळा अशी तरतरीत कामे करतात की ‘किलबिल’ नावाखाली येणारा मासिकांमधील मजकूर खरा असावा, अशी शंका येऊ लागते. ही मुले फक्त त्यांच्या वयाच्या मुलांसारखी वागत नाहीत.



राजश्री
जितेंद्र

कृष्णराव वाशिर्डे यांनी छायाचित्रण अप्रतिम साधलेले आहे. कनू देसाई यांचे कलादिग्दर्शनही नयनरम्य आहे. गीतांच्या चाली चांगल्या आहेत (पहिले धांगड-धिंग्याचे आचरट गाणे वगळून).

राजश्री यांची नृत्ये म्हणून जे काही दाखवले जाते ते अगम्य होय ! बेंबीच्या खाली चार अंगुळे वस्त्र. कारण बेंबीतदेखील सोन्याचा दागिना अन् तो दागिना तर दिसायलाच हवा.

या सगळ्या गोंधळात हा चित्रपट कशाकरता शांताराम यांनी काढला, याचा पत्ता लागणे शक्य नाही. यात एक शांतिमंदिर बांधले जाते. मध्ये मातृत्व साकारलेले. मातेच्या मांडीवर एक मूल, भोवती सगळी राष्ट्रीय एकात्मकता. शांतारामांची ही शांती म्हणजे काय हे फक्त तेच सांगू शकतील. पामरांना ते शक्य नाही.

शांताराम यांनी आपल्या चित्रपटाचा प्रेक्षक म्हणून जो कल्पिला आहे, त्याचे आमच्यापुढे उभे राहणारे चित्र असे आहे–

त्याचे पोट सुटलेले आहे. अंगावर खादीचा झब्बा आहे. हाताशी फोन आहे. काळ्याबाजाराचा शीण त्याला आलेला आहे. त्याला मनरंजन हवे आहे. सवंग रंगीत राष्ट्रीय एकात्मकतेशी ' निका ' लावलेले. तेवढीच धंद्याला मदत. या माणसाला धर्म नाही, जात नाही, कशाचा आग्रह नाही, काही गेल्याचे दुःख नाही.

अशा वृत्तीची सध्या चलती आहे. शांतारामांनी हे ओळखले आहे. आम्हीही शांतारामांना ओळखले आहे. कुणी विचारले, चित्रपट कसा होता ? आमचे उत्तर आहे, ' झीट आया पिक्चराने '

—महेश

# भिंतीच्या तुंबड्या

## ● बुद्धीचा धूर

झू बघायला जाणारी काही वात्रट माणसे माकडांना विडी ओढायची सवय लावतात. पूर्वी अशी माकडे पाहून वाटायचे "नरेचि केला हीन किती वानर !" पण आता हे मत बदलायला हवे. कारण परवाच एका शास्त्रज्ञाने असे मत प्रकट केले आहे, की धूम्रपानाने बुद्धी वाढते ! म्हणजे आता माकडाला विडी देणारा बुद्धिमान माणूस उत्क्रांतीच्या सोपानावरून पाय घसरून पडलेल्या सजातीयाला सावरण्यासाठीच तसे करतो, असे म्हटले पाहिजे. यापुढे हाती कोलीत घेतलेले माकड आणि तोंडात विडी असलेले माकड यांच्यात जमीनअस्मानचा फरक दिसणार. शिवाय मद्य प्यालेले मर्कट व विडी पिणारे त्याचे भावंड यांच्यात तुलना होणे नाही.

धूम्रपानाने बुद्धी वाढते, हे एकदा मान्य केले म्हणजे बुद्धीची ही धूम्रवलयांकित वाढ विडी–सिगरेटच्या ब्रँडवर अवलंबून राहणार, हे ओघानेच आले. बोर्डाची परीक्षा द्यायची असेल, तर भिकुसा यमासा सिन्नर विडीचा झुरका पुरे; पण बी. ए.–एम्. ए. च्या परीक्षेला कॅप्स्टन पाहिजे अन् आय्. ए. एस. ची परीक्षा चिरूट न ओढता द्यायला कोणता उमेदवार धजेल ? फिल्टर–टिप सिगारेटमधून जो धूर फिल्टर होतो, तो बहुधा बुद्धीचाच धूर असावा.

## ● आधुनिक यक्षप्रश्न

नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या माणसाने कुठल्या प्रश्नांच्या उत्तराची तयारी ठेवावी? सुदैवाने हिंदुस्थान सगळ्याच बाबतीत मागासलेला असल्याने आपल्याकडे याचा तर्क करणे फारसे कठीण नाही. नोकरीत जे काम असेल, त्याची माहिती असली म्हणजे पुरे; पण अमेरिकेसारख्या अती पुढारलेल्या (अर्थात अती शहाण्या) देशांत जे प्रश्न विचारले जातात, त्यांच्यापुढे यक्ष प्रश्न विचारणारा यक्षदेखील शरण यायचा. अमेरिकेच्या 'पीस कोअर' मध्ये दाखल होऊ इच्छिणाऱ्यांसाठी एक प्रश्नपत्रिका आहे. त्यात म्हणे एक प्रश्न असा आहे: "तुम्हांला मांजर, सिंह, घोडा, कुत्रा आणि सीगल पक्षी यांपैकी काय होणे आवडेल ?" आता बोला ! हिंदुस्थानात

~ ~ ~ ~ ~ ~ ~

~ ~ ~ ~ ~

—सुधाकर राजे

~ ~ ~ ~ ~

~ ~ ~ ~ ~ ~ ~

अशी समजूत आहे, की माणसाचा जन्म मोठा दुर्लभ आहे अन् अमेरिकेतल्या माणसांना विचारतात, तुम्हांला घोडा व्हावेसे वाटते की कुत्रा ? आणि समजा, एखाद्याला प्रश्नपत्रिकेतल्या पशुपक्ष्यांपैकी काहीच व्हावेसे न वाटता हत्ती, बोकड, उंदीर किंवा कावळा असे काही व्हावेसे वाटले तर ? या जनावरांना प्रश्नपत्रिकेत स्थान नाही, एवढ्यावरूनच बिचारा उमेदवार नाउमेद व्हायचा.

माणसाला जनावर व्हावेसे वाटते का आणि वाटल्यास कोणते, हे बाजूला ठेवले तरी मानवी जीवनातदेखील उमेदवार काय करतो, याची मोठी मजेदार छाननी होते. "व्होग" या फॅशनला वाहिलेल्या फॅशनेबल अमेरिकन मासिकात नोकरी हवी असलेल्याला विचारण्यात येते– "तुम्ही कधी अमेरिकन सरकार उलथविण्याचा प्रयत्न केला आहे काय ?" बिचारा काय उत्तर देणार ? "केला होता, पण फसला; तेव्हा आता तेवढेच भयंकर असे दुसरे एक कृत्य करायला उद्युक्त झालो आहे व ते म्हणजे 'व्होग' मासिकात नोकरी करण्याचे !"

—पण गरजवंताला एवढी अक्कल असावी लागते. हिंदुस्थानात काय अन् अमेरिकेत काय, अर्जदाराने स्वतंत्र बुद्धी दाखवली, की तो गचकलाच. पीस कोअरच्या एका उमेदवाराने प्रश्नपत्रिकेतल्या झूपैकी सीगल पक्षी पसंत केला आणि मग बाकीच्या प्रश्नांची उत्तरे त्याच्याच खाली लिहिली. "तुम्ही कोठे झोपता ?" "समुद्राच्या लाटेवर." "किती खाता ?" "एकही मासा सोडीत नाही." अर्थात त्याला डच्चू मिळाला. न्यूयॉर्कमधल्या एका प्रमुख प्रकाशन–संस्थेने एका अर्जदाराचे डोके तपासण्यासाठी त्याला एका मनोवैज्ञानिकाकडे पाठविला. डॉक्टराने विचारले, "तुमच्या खोलीत कुठे तरी पडलेली एखादी लहान वस्तू अंधारात कशी शोधून काढाल ?" उमेदवाराने शांतपणे उत्तर दिले, "मी दिवा लावीन." डॉक्टरने रिपोर्ट पाठविला. माणूस अगदीच उच्छृंखल आहे.

तात्पर्य काय, अकलेला रजा दिली म्हणजेच गरज पुरी होते. हल्लीच्या गरजू दिवसात धूम्रपान निषेधाची चळवळ जगभर पसरत आहे, तिचे वरवरचे कारण

धूम्रपानाने कॅन्सर होतो, हे असले तरी खरे कारण धूम्रपानाने अक्कल–हुशारी वाढण्याची भीती आहे, हेच असावे.

## • वैज्ञानिक तोतया

लोकशाही कारभार म्हणजे सावळागोंधळ, हे जगन्मान्य समीकरण पार तोंडघशी पाडणारी एक घटना नुकतीच साम्यवादी रशियात घडली. उच्च वैज्ञानिक संशोधन करणाऱ्या दोन दोन संस्थांत प्रमुखपदी काम करणारा एक इसम फक्त थोडीशी शाळा शिकलेला आहे व त्याची पीएच्. डी. डिग्री बनावट सहीची आहे; हे तब्बल दोन वर्षांनी थोड्या दिवसांपूर्वी उघडकीला आले !–आणि तेही त्याच्या शास्त्रीय (अ)ज्ञानाचे पितळ उघडे पडले म्हणून नव्हे, तर त्याने पैसे खाण्याचा प्रयत्न केला म्हणून. शाबास, तोतया! चंद्रावर झेंडा लावणाऱ्या रशियन शास्त्रज्ञांचादेखील मामा करणारा बहाद्दर निघू शकतो तर ! " शाईशिवाय लिहिणारे यंत्र " म्हणून पेन्सिल मागविणारे महाभाग आपल्या देशात निघतात, यात नवल काय ?

पण शास्त्रज्ञांच्या गराड्यात ही वैज्ञानिक तोतयेगिरी छपून कशी राहिली ? " इझव्हेस्तिया " हे रशियन वर्तमानपत्र म्हणते, याचे उत्तर अगदी सोपे आहे. या बेट्याने दोन वर्षांत काम असे केलेच नाही आणि कामच नाहीतर कामांत चुका कोठून होणार ? म्हणजे काम न करण्याची भांडवलशाही कला या कामगारांच्या स्वर्गातदेखील अवगत आहे म्हणायची ! मार्क्सने " जगातल्या कामगारांनो, एकत्र व्हा ", असे आवाहन केले, पण त्याने त्यांना " आराम हराम है, " असे कुठे सांगितले ?

• • •

### एकपात्री फसवणूक

चार्लस् डिकन्ससारखा वेष करून डिकन्सच्या कथा-कादंबऱ्यांचे एकपात्री वाचन करणारे सुप्रसिद्ध नट एमलिन विल्यमस भारतात आले आहेत. दिल्लीत गप्पा मारताना ते ठामपणे म्हणाले, " मी नाटकाचा एकपात्री प्रयोग मात्र कधीही करणार नाही; कारण माझ्या मते ती फसवणूक ठरेल. " मराठी नाटकांचे एकपात्री प्रयोग करणाऱ्या मंडळींना ही खास सूचना.

[ पृष्ठ ५ वरून ]

स्वरूप करण्याचा आज आम्ही प्रयत्न करीत आहोत. ही सर्व युगे आमच्यामध्ये आणि आमच्या देशामध्ये आज प्रतिबिंबित झाली आहेत. संघटित शक्ती आणि जोम ही नव्या युगाची प्रतीके आहेत. आमच्या देशात अणुविज्ञानाचा आणि परमाणुशक्तीचा विकास घडून येत आहे आणि त्याचबरोबर गोमयाचे महात्म्य आम्ही अद्यापही मानीत आहोत. अशारीतीने प्रत्येक शतकाचे प्रतिबिंबिब या देशात दिसत असून, त्याशिवाय त्यामध्ये विपुल विविधताही आहे. या विविधतेच्या मुळाशी एकता आहे. कितीही दुर्दैवाचे आणि विनाशाचे प्रसंग आमच्यावर ओढवले, तरीही या एकतेनेच आम्हा भारतीयांना युगानुयुगे संघटित ठेवले. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या जगामध्ये आम्ही उडी घेत आहोत. निसर्गशक्तीवर अधिकाधिक ताबा मिळवता येईल, अशारीतीने आमचे ज्ञान सुसंघटित करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतु केवळ आमचे दारिद्र्य आणि आमचा अपुरा विकास यांमुळेच नव्हे, तर काही परंपरागत कल्पनांचा आणि चालीरीतींचा आमच्या मार्गात व्यत्यय येत आहे. त्याचबरोबर आम्ही आमच्या भूतकालाची उपेक्षा केली, तर आमचा भविष्यकाळ पोकळ आणि अर्थशून्य राहील, हेही तितकेच खरे आहे.




प्रत्येक
समारंभासाठीं
गोल्ड
स्पॉट
हवेंच!

ना बॉटलिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
(पार्ले पेयांचे अधिकृत उत्पादक)
मंगळवार पेठ, पुणे-११ फोन: २४९०९

उद्याच्या भारताची घडण आमच्या परिश्रमांवर अवलंबून आहे. औद्योगिक आणि इतर क्षेत्रांत भारताची उन्नती होईल. विज्ञानात आणि तंत्रशास्त्रात त्याची प्रगती होईल. आमच्या लोकांचे जीवनमान वाढेल. शिक्षणाचा प्रसार होईल. आरोग्य सुधारण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल आणि कला व संस्कृती. भारतातील लोकांचे जीवन समृद्ध करतील याविषयी मला मुळीच शंका नाही. निश्चित ध्येय पुढे ठेवून शुद्ध अन्तःकरणाने आम्ही या तीर्थयात्रेला निघालो आहोत. आमचा हा प्रवास कितीही लांबचा असला, तरी आम्ही आमच्या इच्छित स्थळी पोचू अशी आम्हांला खात्री आहे.

## सत्तेला शहाणपणाची जोड हवी

परंतु मला जी चिंता आहे ती केवळ आमच्या भौतिक प्रगतीविषयीच नव्हे, तर आमच्या लोकांचे शील आणि त्यांच्या मनाची सखोलता यांविषयी आहे. औद्योगिक प्रगतीने सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळे वैयक्तिक संपत्ती आणि सुखी जीवन साध्य करून घेण्याच्या प्रयत्नात आम्ही आमचे व्यक्तिमत्त्व तर गमावणार नाही ना ? तसे झाले तर ती एक शोकान्तिका ठरेल. कारण त्यामुळे ज्या व्यक्तिमत्त्वाबद्दल भारताची गतकाळात प्रसिद्धी होती आणि मला वाटते, वर्तमानकाळातही जे व्यक्तिमत्त्व गांधीजींच्या जीवनात प्रतीत झाले, ते नाहीसे होईल. सामर्थ्य आवश्यक आहे, पण सुज्ञपणाचीही तितकीच गरज आहे. सत्तेला शहाणपणाची जोड मिळाली, तरच ते चांगले असते.

आज आपण सर्वजण अधिकारांची आणि खास हक्कांची भाषा बोलतो आणि त्यांची मागणी करतो. परंतु आमचा जुना धर्म आमच्या कर्तव्याविषयी आणि जबाबदाऱ्यांविषयी आम्हांला सांगतो. कर्तव्ये पार पाडल्यानंतरच अधिकार प्राप्त होतात.

विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीची मानसिक आणि आत्मिक प्रगतीशी सांगड घालणे आपल्याला शक्य आहे का ? हाच मुख्य प्रश्न आहे. विज्ञानाशी आपण प्रतारणा करू शकणार नाही. कारण ते आजच्या जीवनाचे मूलभूत तत्त्व आहे. परंतु ज्या आवश्यक तत्त्वांचा आम्ही गतकाळात शेकडो वर्षे पुरस्कार करीत आलो, त्यांच्याशी प्रतारणा करणे त्याहूनही शक्य नाही. तेव्हा आपले सर्व शक्तिसामर्थ्य एकवटून आपण औद्योगिक प्रगतीच्या मार्गाने गेले पाहिजे आणि त्याचबरोबर सहिष्णुता, दया आणि सुज्ञपणा यांच्याशिवाय भौतिक संपत्ती मातीमोल ठरेल, हेही आपण ध्यानात ठेवले पाहिजे. शांततेचा पुरस्कार करणारे धन्य होतात, हे आपण विसरून चालणार नाही.

●

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>रा ज हं स | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 15 May 1965 : 25 Paise : Regd NO. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

# चप्पल्स




स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें 3.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर